अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि.१८ एप्रिल २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १९९ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

चेन्नईचा आरसीबीवर ८ धावांनी विजय, ग्लेनची वादळी अर्धशतकी झुंज व्यर्थ

बंगळुरु : आयपीएलच्या २४ व्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्स संघाने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुवर विजय मिळवला. बंगळुरुच्या एम चिन्नास्वामी स्टेडिअमवर ही रोमांचक लढत पाहायला मिळाली. यांच्यात लढत पाहायला मिळत आहे. आरसीबीने नाणेफेक जिंकत गोलंदाजीचा निर्णय घेतला. चेन्नईच्या फलंदाजांनी बंगळुरुच्या फलंदाजांना चांगलंच धुतलं. चेन्नई संघाने सहा गडी गमावून २२६ धावांची खेळी केली. चेन्नई संघाने बंगळुरु संघाला २२७ धावांचं लक्ष्य दिलं आहे. मात्र आरसीबी २० षटकात २१९ धावाच करु शकला. त्यामुळे शेवटच्या चेंडूवर चेन्नईने बंगळुरु विरुध्दचा सामना आठ धावांनी जिंकला. अखेरच्या षटकात चेन्नईने आरसीबीवर आठ धावांनी विजय मिळवला.

आयपीएल सामना क्र.२५

SUNRISERS HYDERABAD Vs MUMBAI INDIANS

सनरायझर्स हैदराबाद
विरुद्ध मुंबई इंडियन्स

वेळ : सायं.७.३० वा.
स्थळ : राजीव गांधी स्टेडियम, हैदराबाद

माजी मुख्यमंत्री शेट्टर यांनी

भाजपला दिली सोडचिठ्ठी, काँग्रेसला मारली मिठ्ठी

सुराज्य/सोलापूर

'मी मनावर दगड ठेवून विधानसभा सदस्यत्वाचा आणि पक्षाचा राजीनामा देत आहे. मी तोच आहे ज्याने पक्ष तयार केला आणि उभा केला आहे. पण पक्षातील काही नेत्यांनी मला पक्षाचा राजीनामा देण्यास भाग पाडले आहे,' अशी भावना व्यक्त करत कर्नाटकातील लिंगायत समाजाचे मातब्बर नेते आणि माजी मुख्यमंत्री जगदीश शेट्टर यांनी सोमवारी 'कमळा'शी कट्टी करून भाजपला सोडचिठ्ठी देत काँग्रेसमध्ये प्रवेश करत 'हाता'शी गट्टी केली. काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, प्रदेशाध्यक्ष डी.के. शिवकुमार आणि काँग्रेसचे केंद्रीय नेते रणजित सुरजेवाला यांच्या उपस्थितीत शेट्टर यांनी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.

तब्बल गेल्या सहा टर्मपासून हुबळी-धारवाड मध्य मतदारसंघाचे आमदार असलेले जगदीश शेट्टर यांचा भाजपने पत्ता कट केला होता. आत्तापर्यंत जाहीर झालेल्या दोन्ही उमेदवारी यादींमध्ये त्यांना उमेदवारी दिली नाही. त्यामुळे नाराज शेट्टर यांनी मुख्यमंत्री बसवराज बोम्मई आणि केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याशी चर्चाही केली होती. परंतु, ही चर्चा अपयशी ठरली. त्यानंतर त्यांनी भाजपला सोडचिठ्ठी देत काँग्रेसमध्ये प्रवेश करणे पसंत केले.

येडियुरप्पांच्या नातवाचा जेडी(एस) मध्ये प्रवेश

भाजपचे नेते, कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी.एस. येडियुरप्पा यांच्या नातवाने भाजपला सोडचिठ्ठी देत जनता दल (एस) म्हणजे कुमारस्वामींच्या पक्षात प्रवेश केला आहे. एन.आर. संतोष असे त्यांचे नाव आहे. संतोष यांना हासन जिल्ह्यातील असीकेरे विधानसभा मतदारसंघातून जेडीएस रिंगणात उतरवणार आहे. संतोष हे येडियुरप्पा यांच्या बहिणीचे नातू आहेत. त्यांना भाजपने त्यांना तिकीट दिले नाही. आपल्या नातवाचा तिकीट न दिल्याने येडियुरप्पा यांच्या बहिणीने आपल्या भावाबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

उपमुख्यमंत्र्यांपाठोपाठ मुख्यमंत्रीही काँग्रेसमध्ये

विधानसभेच्या निवडणुका जाहीर होताच कर्नाटकामध्ये राजकीय उलथापालथ सुरू झाली. उमेदवारीचा पत्ता कट केल्याच्या कारणावरूनच दोन दिवसांपूर्वी माजी उपमुख्यमंत्री असणारे भाजप नेते लक्ष्मण सवदी यांनी भाजपला रामराम ठोकून काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. यासंदर्भातील चर्चा अद्याप संपलेली नसतानाच माजी मुख्यमंत्री जगदीश शेट्टर यांनीसुध्दा उमेदवारी न मिळाल्याच्या कारणावरूनच भाजपला सोडचिठ्ठी दिली आहे. तेसुध्दा काँग्रेसवासी झाल्यामुळे भाजपसमोरील अडचणींत वाढत झाली आहे.

कोण आहेत जगदीश शेट्टर?

विद्यार्थी परिषद आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून राजकारणात आलेले शेट्टर यांचा कर्नाटकच्या बागलकोट जिल्ह्यामध्ये बदामी तालुक्यातील केरुर या गावी १९५५ मध्ये जन्म झाला. ते २०१२ ते २०१३ दरम्यान कर्नाटकाचे १५ वे मुख्यमंत्री होते. सलग सहावेळा आमदार असलेले शेट्टर लिंगायत समाजातील मातब्बर नेते आहेत. काँग्रेस नेते सिध्दरामय्य मुख्यमंत्री असताना २०१४ ते २०१८ या काळात शेट्टर हे विधानसभेचे विरोधी पक्षनेते होते. शिवाय २००८-०९ या काळात विधानसभेचे अध्यक्षपदही त्यांच्याकडे होते. येडियुरप्पा यांच्या मंत्रिमंडळात शेट्टर हे महत्त्वाचे मंत्री होते. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक-राजकीय कार्याला सुरुवात केली होती.

स्मार्ट सिटी संचालक मंडळाची बुधवारी बैठक

दुहेरी जलवाहिनी कामासंदर्भात संयुक्त तडजोड प्रस्तावास देणार मान्यता

सुराज्य/सोलापूर

उजनी-सोलापूर समांतर जलवाहिनी विषयासंदर्भात सोलापूर स्मार्ट सिटी कार्पोरेशनच्या संचालक मंडळाची अंतिम बैठक बुधवार दि. १९ एप्रिल रोजी होणार आहे. या बैठकीत पोचमपाड सोबतच्या संयुक्त तडजोड प्रस्तावास मान्यता देण्यात येणार असल्याची माहिती सीईओ शीतल तेली - उगले यांनी दिली.

सोलापूर स्मार्ट सिटी कार्पोरेशनच्या संचालक मंडळाची गुरुवारी बैठक झाली होती. उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनी कामासंदर्भात स्मार्ट सिटी व पोचमपाड यांच्यातील तडजोड प्रस्तावाअंतर्गत नियम, अटी - शर्तीवर दीर्घ चर्चा झाली होती. त्यानंतर आता बुधवार दिनांक १९ एप्रिल रोजी यासंदर्भात संचालक मंडळाची अंतिम बैठक होणार आहे. बुधवारच्या बैठकीत स्मार्ट सिटी व पोचमपाड कंपनी यांच्यातील नियम, अटी-शर्तीच्या संयुक्त तडजोड प्रस्तावास मान्यता देण्यात येणार आहे. त्यानंतर अंतिम तडजोड प्रस्ताव लवादाकडे सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर लवाद आदेश देणार आहे, अशी माहिती सीईओ शीतल तेली-उगले यांनी दिली.

निराधार महिलांना उत्पन्नाचे दाखले देण्यास नकार

तलाठ्यांवर कारवाई करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

सोलापूर : संजय गांधी निराधार योजनेसाठी निराधार महिलांना उत्पन्नाचे दाखले देण्यास नकार देणाऱ्या कसबे सोलापूरच्या तलाठ्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी शंभरकर यांनी दिले. याबाबत उत्तर सोलापूर तहसीलदार यांना तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना देखील केल्या.

शहर आणि जिल्ह्यातील निराधार महिलांना शासनाकडून संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत अनुदान दिले जाते. मात्र या अनुदानासाठी प्रकरणे सादर करताना २१ हजार उत्पन्नाची आट घातली आहे २१ हजाराचा उत्पन्नाचा दाखला तलाठी कार्यालयातून घ्यावा लागतो मात्र हा दाखला दिला जात नाही तलाठी सदरचा दाखला देण्यास नकार देत असल्याच्या तक्रारी वाढल्या अशीच कैफियत घेऊन काही निराधार महिला जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी भर उन्हात आल्या होत्या त्यांनी तहसील कार्यालय तलाठी कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालय अशी पायपीट केली. तरी देखील त्यांची कोणी दखल घेतली नाही या भर उन्हात पायपीट केल्याने गामायूम झालेल्या आणि व्याकूळ झालेल्या या महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आल्यानंतर दोन महिलांना चक्कर आली त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात धावपळ झाली या निराधार महिलांनी कसबे सोलापूरच्या तलाठ्यांनी दिलेली वागणूक प्रसारमाध्यमाच्या प्रतिनिधी समोर मांडली याबाबत नव्याने पदभार घेतलेल्या उत्तरचे तहसीलदार सैफन नदाफ यांनी तात्काळ दखल घेत तलाठ्याला समज देत तात्काळ उत्पन्नाचे दाखले देण्याबाबत सूचना केली मला जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले तरी मी उत्पन्नाचा दाखला देणार असे ठामपणे सांगितले याबाबतची कल्पना पत्रकारांनी जिल्हाधिकारी शंभरकर यांना दिली दिली असता उत्तर सोलापूरचे तहसीलदार सैफन नदाफ यांना दाखले देण्यास नकार करणाऱ्या तलाठ्यांवर कारवाई करा असे ठाम असे आदेश दिले आहेत.

तडीपार आरोपीच्या डोळ्यात चटणी टाकून कोयत्याने वार

बार्शी : सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार केलेला बार्शीतील माया गँगचा म्होरक्या विशाल रणदिवे याच्या डोळ्यात चटणी टाकून त्याच्यावर कोयत्याने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी चौघांवर बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विशाल सुनील बनसोडे, स्वप्निल ऊर्फ सुर्या स्वामी (दोघे रा. वाणी प्लॉट बार्शी), विकास पिंटू पारसे, निलेश पवार (दोघे रा. पंकज नगर बार्शी) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. विजय गणेश आदमिले (रा संतोषी माता चौक बार्शी) याने याबाबत फिर्याद दिली आहे.

दि १६ रोजी रात्री ९.३० वा चे सुमारास विशाल गायकवाड (रा. पंकज नगर बार्शी) यांचे घराजवळ असलेल्या पत्र्याच्या शेडच्या पाठीमागे फिर्यादी तसेच विशाल विठ्ठल रणदिवे, गणेश खंडू शिंदे असे उभे असताना चौघे संशयित हे हातामध्ये कोयते व लाकडी दांडके घेऊन आले. त्यांनी विशाल रणदिवे याला तुला जिवंत सोडणार नाही असे म्हणून विनाकारण त्याच्या डोक्यात, हातावर, पायावर, कोयत्याने तसेच लाकडी दांडके घेऊन डोळ्यात चटणी फूड टाकून विशाल रणदिवे यास जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने वार करून गंभीर जखमी केले. स्वप्निल ऊर्फ सुर्या स्वामी याने शिवीगाळ करून उलटा कोयता फिर्यादीच्या उजव्या खांद्यावर मारला व इतरांनी फिर्यादीस लाकडी दांडक्याने मारहाण केली. स्वप्निल ऊर्फ सुर्या स्वामीने तू मध्ये आलास तर मी तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी फिर्यादीस दिली व शिवीगाळ केली अशा आशयाची तक्रार दिली.

होर्डिंग अंगावर पडून पाचजणांचा मृत्यू

पिंपरी : पिंपरी-चिंचवड परिसरात होर्डिंग पडल्याच्या दोन घटना घडल्या आहेत. पुण्याला लागून असलेल्या किवळे गावात होर्डिंग कोसळल्याने पाचजणांचा मृत्यू झाला आहे. सोमवारी संध्याकाळी वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे बचावासाठी होर्डिंगचा आडोसा घेतला. मात्र, वादळामुळे अचानक हे होर्डिंग पडल्याने मृत्यू झाला आहे.

सोलापुरातील मृत श्री सदस्यांच्या कुटुंबीयांचे सात्वंन

तहसीलदारांची भेट; आज जिल्हाधिकारी देखील भेटणार

महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण सोहळ्यात उष्माघाताने झाला होता मृत्यू

सुराज्य/सोलापूर

खारघर येथे रविवारी ज्येष्ठ निरुपणकार अप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान सोहळ्यात मृत्युमुखी पडलेल्या श्रीसदस्यांमध्ये जिल्ह्यातील दोन महिलांचा समावेश आहे. या दोन्ही ठिकाणी मृतांच्या नातेवाईकांना तहसीलदारांनी भेट देऊन सांत्वन केले असून लवकरच जिल्हाधिकारीही भेट घेणार आहेत.

खारघर येथील महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण सोहळ्यात सोलापूर जिल्ह्यातून एक ते दीड लाख भक्त सहभागी झाले होते. २४३ एसटी बस व अनेक खासगी बसने शनिवारी रात्री श्रीसदस्य मुंबईकडे रवाना झाले होते. याशिवाय अनेकजण स्वत:च्या वाहनाने या सोहळ्यासाठी गेले होते. सोलापूरमधील तोडकरी वस्ती, बाळे येथील कलावती सिध्दाराम वायचळ (वय ४५) व मंगळवेढा येथील संगीता संजय पवार (वय ४२) या दोन महिलांचा खारघर येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. सोमवारी दोघींचेही मृतदेह त्यांच्या गावी पाठविण्यात आले आहेत. अंत्यविधी करण्यात आला आहे. या दोन्ही ठिकाणी सोमवारी तहसीलदारांनी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले आहे. लवकरच जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकरही भेट देणार आहेत. बाळे येथील कलावती सिध्दाराम वायचळ यांच्या पश्चात पती, रमेश व महेश अशी दोन मुले व एक विवाहित मुलगी असा परिवार आहे. तर मंगळवेढा येथील संगीता संजय पवार यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

आपल्यापेक्षा त्यांचेच लक्ष जास्त आहे 'आकड्याकडे !

कल्याण
236-12-345

मेन बाजार

उड्डाणपूल भूसंपादनाची प्रक्रिया जून अखेरपर्यंत पूर्ण करणार : आयुक्त

■ राष्ट्रीय महामार्गकडून निविदा काढण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ

सुराज्य/सोलापूर

शहरातील उड्डाणपुलांच्या भूसंपादनाचे काम वेगाने सुरू असून जुना पुणे नाका ते पत्रकार भवन या फेज एकमधील उड्डाणपुलाच्या भूसंपादनाची प्रक्रिया येत्या जून अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली.

मागील सहा वर्षांपासून प्रलंबित असलेल्या दोन उड्डाणपुलांच्या प्रकल्पाला गती आली आहे. जुना पुणे नाका ते पत्रकार भवनपर्यंत या मार्गावरील उड्डाणपुलासाठीची प्रक्रिया वेगात सुरू आहे. साडेपाच कि.मी. मार्गाच्या भूसंपादनासाठी एकूण ७ ते ८ टप्पे पाडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निवाडा मंजूर करून घेण्यात येत आहे.

या मार्गातील शासकीय जागांचा विषय महापालिकेकडे असून भूसंपादन विभागाकडे केवळ खासगी जागांसाठीची प्रक्रिया केली जात आहे. या मार्गावर एकूण १०२ खासगी मिळकती आहेत. पहिल्या टप्प्यातील उड्डाणपुलाचा निवाडा जाहीर करून मिळकतदारांना मोबदला देण्यासाठी जून अखेरपर्यंत भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून द्यावी, अशा सूचना आयुक्त शीतल तेली-उगले यांनी

भूसंपादन विभागाला दिल्या आहेत. एकूण ८ पैकी ४ टप्प्यांची रक्कम भरण्यात आली आहे. उरलेल्या ४ टप्प्यांची ३० टक्के रक्कम भरलेली आहे, असे आयुक्त तेली - उगले यांनी स्पष्ट केले. उड्डाणपुलासंदर्भात ताबा घेण्याचे काम भूसंपादन विभागाचे आहे. महापालिका प्रशासन केवळ रक्कम भरणार असल्याचेही सांगितले. चार टप्प्यांचे पैसे भरणा केले असून त्यासाठी ११.२० कोटी रुपये कर्ज मंजूर झाले आहे. त्यात ४.८० कोटी अनुदानापोटी मिळणार आहेत. एकूण २५ कोटी कर्जाची मागणी केली आहे. त्यात दहा कोटी रुपये अनुदान प्राप्त झाले आहे, असेही मनपा आयुक्तांनी सांगितले. महापालिकेला ३० टक्के रक्कम भरावी लागणार आहे. त्याची पूर्तता करण्यात आली आहे, असेही महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी स्पष्ट केले.

महापालिकेच्या सर्वंकष सर्व्हेक्षणासंदर्भात आज बैठक

महापालिका प्रशासनाकडून शहरातील मिळकतकर, नळ कनेक्शन, ड्रेनेज कनेक्शन, प्रॉपर्टी कार्ड या विविध घटकांचा सर्वंकष सर्व्हे करण्यात येणार आहे. त्या संदर्भातली नियोजन बैठक मंगळवारी घेण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली. या बैठकीमध्ये एकूण किती पथके लागणार आहेत, डाटा एन्ट्री, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण यासंदर्भात नियोजन करण्यात येणार असल्याचेही महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी सांगितले.

रस्त्यांच्या कामाचे टेंडर उघडले

राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रमांतर्गत महापालिकेला एकूण २२ कोटी रुपये निधी प्राप्त झाला आहे. या निधीतून दहा कोटी रुपयाचे रस्ते तर उर्वरित १२ कोटी निधीतून थीम्स करण्यात येणार आहेत. त्यापैकी दहा कोटी निधीतून करण्यात येणाऱ्या रस्त्याचे टेंडरही उघडण्यात आले आहे. पुढील प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. शहरातील विविध निवडक ठिकाणी कारंजे करण्यात येणार आहेत. तसेच हरितपट्टे तयार करण्यात येत आहेत. यामुळे शहराचा चेहरामोहरा बदलणार असल्याचे महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी सांगितले.

विरोधक काय करणार?

केंद्रीय राजकारणात भाजपाच्या विरोधात भाजपेतर पक्षनेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार २०२४मध्ये कसल्याही परिस्थितीत पाडून टाकायचे याच इराद्याने तयारी चालवलेली दिसत आहे.विरोधी पक्षांकडून पंतप्रधानपदाच्या शर्यतीत आपण असल्याचे सूचक विधान बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी केल्याने देशाचे राजकारण एका वेगळ्या वळणावर येणार असे म्हणावे लागेल.नितीश यांनी राहुल गांधी व अरविंद केजरीवाल यांची भेट येतली.काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे.त्या पक्षाला डावलून अथवा अंधारात ठेवून विरोधकांना आघाडी करताच येणार नाही. पंतप्रधानपदाच्या बाबतीत राहुल हे मौन बाळगून आहेत. अन्य विरोधी पक्षनेतेच पंतप्रधानपदावरून उड्या मारत आहेत. कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीत भाजपामध्ये मोठ्या प्रमाणात बंडखोरी सुरू झाली आहे. त्यामुळे काँग्रेस नेत्यांना एकप्रकारे चेवच आला असून आता सत्ता आमच्या खिशात आहे, अशीच त्यांच्याकडून केली जात आहे. त्यामुळे सध्या विरोधकांची हवाच हवा, असे म्हणावे लागेल. विरोधी पक्षीयांनी रस्त्यावर उतरण्याची ही केवळ संधी नव्हे तर हीच वेळ आहे. तरच लोकांनाही विश्वास वाटू लागेल. इतकेच नव्हे तर भाजपमधील असंतुष्टांनाही बळ मिळेल. लोकसभा निवडणुकीच्याही आधी, विरोधकांची महाआघाडी अहिंसक आंदोलनासाठी होण्याची खरी गरज आहे, असे सूचित करून राजकीय विचारवंत विरोधकांना एकप्रकारे बळच देऊ लागले आहेत. जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी मोदी आणि केंद्र सरकारवर गंभीर आरोप केलेले आहेत. हे सगळे करण्यामागील त्यांचा उद्देश काय हे माहिती नाही; पण त्यांनी विरोधी पक्षांचे काम केले आहे. सध्या तरी मोदींना इतके थेट भिडण्याची हिंमत एकाही विरोधी पक्षनेत्याकडे असेल असे वाटत नाही. आता प्रश्न आहे की, विरोधक काय करणार? गेल्या आठवड्यात दिल्लीत भेटीगाठींचा इतका 'सिलसिला' सुरू होता की, विरोधकांची महाआघाडी झालीच, असेच वाटून गेले. नितीशकुमारांनी मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधींची भेट येतली. या चर्चेत शरद पवार

नव्हते म्हणून, खरगे-राहुल यांनी पवारांना फोन करून दिल्लीला बोलावून येतले. तुम्ही या, आपण चर्चा करू, अशी विनंती केल्यावर पवारांनीही चर्चा केली. नजीकच्या काळात विरोधकांची एकजूट होईल वा होणार नाही. पण सत्यपाल मलिकांच्या मुलाखतीवर एकाही विरोधी पक्षप्रमुख वा नेत्याला पत्रकार परिषद घेऊन बोलावे असे वाटलेले नाही. सत्ताधाऱ्यांनी राष्ट्रीय वृत्तवाहिन्यांच्या मुसक्या आवळल्या आहेत, विरोधी पक्षनेत्यांना बोलण्यापासून कोणी थांबवलेले आहे? अदानी प्रकरणावर शरद पवारांनी भूमिका घेतल्यानंतर ते कुठे उभे आहेत हे इतर विरोधी पक्षांना माहिती झालेले आहे. ते कदाचित मलिक प्रकरणावरही बोलणार नाहीत. पण भाजपपासून फारकत घेतलेल्या नितीशकुमारांनी मौन बाळगण्याचे कारण काय? पवारांनी राहुल गांधींना मतभेदांच्या मुद्द्यावर बोलू नये, असा सल्ला दिला होता. मलिकांवर बोलू नका असे सांगितलेले नाही. खरे तर मलिकांच्या मुलाखतीवर समाजमाध्यमांमध्ये गहजब सुरू असताना राहुल गांधींनी तातडीने काँग्रेसच्या मुख्यालयात पत्रकार परिषद घेऊन मोदी-शहांच्या विरोधात तोफ डागायला हवी होती. पण पत्रकार परिषद घेतली ती जयराम रमेश यांनी! मलिकांची मुलाखत ही विरोधी पक्षांना मिळालेली मोठी संधी ठरू शकेल, ती गमावली तर विरोधकांच्या एकजुटीलाही फारसा अर्थ उरणार नाही. मोदी-शहांची देशातील घटनात्मक संस्थांवर, शासन-प्रशासनावर आणि भाजप-संघावर जबरदस्त पकड आहे, ही बाब कोणीही नाकारू शकत नाही. या दोघांची कार्यपद्धती मंत्रिमंडळातील मंत्र्यांना, पक्षातील नेत्यांना, प्रशासनातील अधिकाऱ्यांना, संघातील साऱ्या प्रचारकांना मान्य आहे असे मानण्याचे कारण नाही. या सगळ्या मंडळींचा मोदी-शहांच्या भूमिकांना विरोधही असेल; पण त्यांना उघडपणे बोलता आलेले नाही. त्यांच्याकडे ही हिंमत नाही कारण त्यांना विरोधी पक्षनेत्यांचा पाठिंबा मिळत नाही. विरोधक रस्त्यावर उतरून मोदी-शहांच्या विरोधात संघर्ष करू लागले तर इतरांनाही बळ मिळेल. आता खरे तर विरोधकांपेक्षा कर्नाटकमधील बंडखोरांचे कौतुक करायला हवे, त्यांना भाजपने उमेदवारी न दिल्याचा उघड निषेध करण्याचे धाडस त्यांनी दाखवले आहे. पक्षामध्ये मोदी-शहांना कोणी आव्हान देऊ शकत नाही, हा दावा कर्नाटक भाजपमधील ज्येष्ठ नेत्यांनी खोटा ठरवला आहे. बंडखोरी करण्यामध्ये या नेत्यांचा राजकीय स्वार्थ असेलही पण, कर्नाटक म्हणजे 'गुजरात' नसल्याचे त्यांनी दाखवून दिले हीच मोठी चपराक ठरते.

राजकीय

संसदेतील गोंधळी...

वर्षातून संसदेची तीन अधिवेशने होतात. मार्च-एप्रिलमध्ये अर्थसंकल्पीय, जुलै-ऑगस्टमध्ये पावसाळी आणि नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये हिवाळी अधिवेशन होते. पूर्वी अनेक वर्षे संसदेचे अधिवेशन शेवटच्या आठवड्यात एक-दोन दिवसांनी कामकाजासाठी वाढवले जात असे. आता मात्र ठरलेल्या दिवसांपूर्वीच ते संपते किंवा गुंडाळले जाते. लोकसभा किंवा राज्यसभेत चर्चा झाली पाहिजे व चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सुटले पाहिजेत. पण केवळ गोंधळ, गदारोळच नव्हे, तर आरडाओरडा, घोषणाबाजी, सभागृह बंद पाडण्याची घाई यातून नुकसान कोणाचे होते? संसदेच्या यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेवटचे तीन आठवडे काँग्रेस व काँग्रेस पक्षांनी दैनंदिन कामकाज होऊ दिले नाही. नव्या वर्षाचे ४५ लाख कोटींच्या बजेटवर सखोल चर्चा झाली नाही. बजेटचे विरोधी पक्षाला काहीच महत्त्व उरलेले नाही, हे दाखवून देणारी ही बाब आहे. विरोधी पक्षाने बजेटवरील चर्चेपेक्षा त्यांच्या राजकीय अजेंडाला महत्त्व दिले आणि संसदेचे कामकाज बंद पाडण्यात धन्यता मानली. राहुल गांधींना गुजरातमधील न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा ठोठावल्याने त्यांची खासदारकी तर गेलीच, पण जनतेच्या प्रश्नांपेक्षा आम्हाला राहुल गांधींचा अजेंडा महत्त्वाचा हाच संदेश काँग्रेसने तीन आठवडे घातलेल्या गोंधळातून दिला.

> संसदेचे सभागृह हे संसदीय लोकशाहीतील सर्वोच्च व्यासपीठ समजले जाते. देशाच्या १४० कोटी जनतेच्या प्रश्नांचे व भावभावनांचे प्रतिबिंब तिथे पडावे, ही अपेक्षा असते.जनतेचे प्रश्न हिरीरीने मांडून सरकारकडून न्याय मिळवून द्यावा, हे विरोधी पक्षांचे काम असते आणि सरकारने जनहिताचे निर्णय या सर्वोच्च व्यापीठावर जाहीर करावेत, हे अपेक्षित असते. सत्ताधारी व विरोधी पक्ष यांच्यात मतभेद, गोंधळ, गदारोळ होणार, हे जनतेही गृहीत धरले आहे. पण सरकारला विरोध करताना किती ताणायचे? याचे भान आज काँग्रेस पक्षाला व काँग्रेसबरोबर फरफटत जाणाऱ्या अन्य विरोधकांना राहिलेले नाही, हे लोकशाहीचे दुर्दैव आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात लोकसभेच्या २५ बैठका झाल्या. विरोधी पक्षाने घातलेल्या प्रचंड गोंधळ व गदारोळाचे दर्शन झाले. ३१ जानेवारी रोजी सुरू झालेले अधिवेशन ६ एप्रिलपर्यंत चालले. सोळाव्या लोकसभेचे हे सतरावे अधिवेशन होते, २५ बैठकांमध्ये ४५ तास ५५ मिनिटे कामकाज झाले. लोकसभेचे अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर अध्यक्षांनी सर्व सदस्यांना चहापानासाठी निमंत्रित केले होते. पण फारच थोड्या जणांनी हजेरी लावली. राष्ट्रपतींचे त्यांच्या अभिभाषणाबद्दल आभार मानणाऱ्या प्रस्तावावर १३ तास ४४ मिनिटे चर्चा झाली, तर केंद्रीय अर्थसंकल्पावर १४ तास ४५ मिनिटे झालेल्या चर्चेत १४५ सदस्यांनी भाग घेतला. या अधिवेशनात आठ सरकारी विधेयके मांडली गेली व त्यातील ४ मंजूर झाली. लोकसभेच्या विविध विषयांवरील स्थायी समित्यांनी ६२ अहवाल सादर केले.

अधिवेशनात २९ तारांकित प्रश्नांना सरकारकडून तोंडी उत्तरे देण्यात आली. शून्य तासाला १२३ विषय मांडले गेले. नियम ३७७ नुसार ४३६ प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यात आले. अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात थोडे तरी कामकाज झाले. पण दुसरे सत्र केवळ गोंधळ आणि गदारोळातच वाहून गेले. विरोधी पक्षाने घातलेल्या गोंधळाविषयी अध्यक्ष ओम बिर्ला यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली. आपली आसने सोडून पुढे येऊन अध्यक्षांपुढील मोकळ्या जागेत विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जो गोंधळ घातला व घोषणाबाजी केली, ती संसदेच्या प्रतिष्ठेला मुळीच शोभणारी नव्हती.

केंद्रीय कायदामंत्री किरण रिजिजू, राज्यसभेतील सभागृह नेता पीयूष गोयल, संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राज मेघवाल यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेत्यांनी म्हटले आहे की, केवळ राहुल गांधी या व्यक्तीसाठी काँग्रेस लोकसभेचे कामकाज होऊ देत नाही. संसदेत काळे कपडे घालून येऊ नये, हे संकेत कित्येक वर्षे पाळले जात आहेत. निषेध व्यक्त करण्यासाठी काळे कपडे किंवा काळे झेंडे आणण्यास किंवा फडकविण्यास येथे मज्जाव आहे. तरीपण शेवटच्या दिवशी काँग्रेस व त्यांचे मित्र पक्षाचे खासदार काळे कपडे घालून संसद भवनात आले होते. हा संसदेचा अवमान नाही का?

विदेशात जाऊन राहुल गांधींनी आपल्याला संसदेत बोलू दिले जात नाही व विरोधक बोलायला उभे राहिले की, त्यांचे माईक बंद केले जातात, अशी टिप्पणी जाहीरपणे केली होती. अशा टिप्पणीतून देशाची बदनामीच त्यांनी केली. पण प्रत्यक्षात काँग्रेस पक्ष सदनाचे कामकाज चालू देत नाही, हे सत्य त्यांनी लपवून ठेवले.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विरोधी पक्षाने काय मिळवले? या प्रश्नाचे उत्तर शोधूनही सापडणार नाही. दर पाच वर्षांनी लोकसभा निवडणूक होते, खासदार म्हणून निवडून आले की, त्यांना देशभर केवढा मोठा मानसन्मान असतो. दहा-पंधरा लाख मतदारसंघाचे संसदेत प्रतिनिधित्व करणाऱ्या खासदारावर सरकार सेवा सवलतींच्या माध्यमातून बराच खर्च करीत असते. मग त्यांनीही संसदेत आपल्या मतदारसंघाचे, राज्याचे व देशाचे प्रश्न मांडायला नकोत का? राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा करायला नको का? जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी आपले संसदीय कौशल्य पणाला लावायला नको का? संसदेचे कामकाज बंद पाडण्यासाठी आपल्या खासदाराला मतदार निवडून पाठवतात का? राहुल गांधींनी विदेशात जाऊन भारताची जी बदनामी केली, त्यावरून लक्ष दुसरीकडे वेधण्यासाठी काँग्रेसने अदानींच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी जेपीसी नेमावी, या मागणीसाठी संसदेला वेठीला धरले होते का? संसदेत एका मिनिटाच्या कामकाजावर अडीच लाख रुपये खर्च होतो. विरोधी पक्षाने तीन आठवडे संसदेचे कामकाज बंद पाडले, याचा हिशेब कोण करणार?

- सुकृत खांडेकर.

टुडेज् ब्लॉग

व्रतस्थ कर्मयोगी...

श्रीमत् दासबोधाचं निरूपण करून समाजमनात सकारात्मक बदल करण्याचा यज्ञ ज्येष्ठ निरूपणकार डॉ. श्री. नारायण विष्णू ऊर्फ नानासाहेब धर्माधिकारी यांनी आठ दशकांपूर्वी सुरू केला. हा यज्ञ त्यांचे चिरंजीव ज्येष्ठ निरुपणकार तसेच पद्मश्री किताबाने सन्मानित डॉ. दत्तात्रेय ऊर्फ आप्पासाहेब धर्माधिकारी यांना पेटता ठेवला आहे. एवढंच नाही तर आता आप्पासाहेबांचे चिरंजीव सचिनदादा धर्माधिकारी यांनीदेखील याच कार्यात स्वत:ला झोकून दिलं आहे. आता तर ज्येष्ठ निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी हे महाराष्ट्र भूषण पुरस्काराचे मानकरी झाले आहेत. ही त्यांच्या समाजकार्याला मिळालेली राजमान्यता म्हणावी लागेल.

समाजातील व्यसनाधीनता, अंधश्रद्धेवर आघात करून समाजमन घडवणाऱ्या नानासाहेबांचं, आप्पासाहेबांच्या आणि सचिनदादांनी हे काही सहज करून दाखवलेलं नाही. विवेकातून वैराग्य मिळवलेल्या ज्येष्ठ निरूपणकार डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांना समाज मनाच्या हृदयात अढळ स्थान मिळवलं आहे. अत्यंत साधी राहणी, तेवढीच साधी वेशभूषा आणि सर्व विकारांकडे पाठ फिरवण्याचं सामर्थ्य असलेल्या नानासाहेबांनी आणि आप्पासाहेबांनी दासबोधाच्या माध्यमातून समर्थांची शिकवण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवली. त्यापूर्वीही दासबोध वाचला जायचा मात्र, आप्पासाहेबांनी याच दासबोधावर निरूपण केलं आणि त्यातून समर्थ समाज घडवला. म्हणूनच आज कोट्यवधी लोक श्रीसेवक बनू शकलेत. त्यांचं आयुष्य बदलून गेलं आहे.

ज्येष्ठ निरुपणकार नानासाहेब धर्माधिकारी यांनी १९४५ मध्ये त्यांनी श्री समर्थ प्रासादिक आध्यात्मिक सेवा समितीची स्थापना करून खऱ्या अर्थानं समाज प्रबोधनाचा पाया रचला. त्यावेळी त्यांच्यासोबत होते अवघे सात समर्थ सेवक. संतांचं कार्य पुढे नेणाऱ्या नानासाहेबांना तत्कालीन समाजाच्या निंदा, नालस्ती, टीकेला तोंड द्यावं लागलं होतं. मात्र, श्रवण बैठकींच्या माध्यमातून होणारं निरूपण आणि त्यातून बदलणारा समाज पाहून हळूहळू नानासाहेबांना विरोध कमी होत गेला. इतकेच कशाला खुद्द विरोध करणारे नंतर दासबोधावर होणाऱ्या श्रवण बैठकीला बसू लागले. नानासाहेब धर्माधिकारी यांनी निरूपणातून समाज घडवायला सुरुवात केली. त्यांचं हेच कार्य आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी सुरू ठेवलं. धर्माधिकारी आणि श्रवणाची बैठक हे अनोखं समीकरण आहे. बैठकीमुळे मनुष्याच्या मनावरील भावनेचा पडदा दूर होऊन तो कर्तव्यदक्ष होतो. समाजातल्या जाती आणि धर्माच्या भिंती कोसळून पडतात. धर्म-अर्थ-काम-मोक्ष यांचा नेमका अर्थ कळतो. अंधश्रद्धा, अज्ञान, अनिष्ट रूढी, व्यक्तिपूजा नष्ट होतात.

या श्रवण बैठकांना येणाऱ्यांचं आयुष्यच बदलून जातं, हा अनुभव आहे. त्यांचा चुकीचा मार्ग बदलला जातो. समाज व्यसनमुक्त होऊ लागतो. त्यांना परमार्थ म्हणजे काय याची जाणीव होऊ लागते. आपण देशाच्या, समाजाच्या, आईवडिलांच्या ऋणात आहोत याची जाणीव करून दिली जाते. यातूनच समर्थ समाजाचा पाय घातला गेला. या श्रवण बैठका आठवड्याच्या सातही दिवस चालतात. केवळ रायगडमध्येच नव्हे तर महाराष्ट्रातल्या आदिवासी



पाड्यांपासून शहरांपर्यंत तसेच अगदी देशातील बहुतांश सर्व राज्यांत एवढंच नाही तर अमेरिका, ऑस्ट्रेलिया, दुबई, सिंगापूर, दक्षिण आफ्रिका सारख्या अनेक देशांत नियमित श्रवण बैठका होतात. ८ जुलै २००८ रोजी नानासाहेबांचं देहावसान झालं. नानासाहेबांच्या कार्याची दखल येत राज्य सरकारने त्यांचा महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरव केला होता. आता याच महाराष्ट्र भूषण पुरस्काराचे आप्पासाहेबही मानकरी झाले आहेत. नानासाहेबांचं समाज घडवण्याचं कार्य आप्पासाहेब धर्माधिकारी तसेच सचिनदादा धर्माधिकारी यांनी अखंड सुरू ठेवलं आहे. समाजातील अंधश्रद्धा दूर करतानाचा जाती-धर्माचा पगडा दूर करणे, देश एकसंध ठेवण्यासाठीही निरूपण बैठकांच्या माध्यमातून कार्य केलं जातं. आप्पासाहेब आणि सचिनदादा धर्माधिकारी श्रवण बैठकींतील सदस्यांना नेहमीच धर्माधिकारी कुटुंबाचे सदस्य मानतात.

माणसातील अवगुण काढले की तो गुणी होतो, असं आप्पासाहेब धर्माधिकारी नेहमी सांगतात. आणि हे अवगुण काढण्याचं कार्य श्रवण बैठकींच्या माध्यमातून केलं जातं. आपल्या संतांनी समाजसुधारणेचं खूप मोठं कार्य केलंय, आपल्या संतांनी कधीही चमत्कार, कधीही अंधश्रद्धेला खतपाणी घातलं नाही. देव कोपत नाही, देव कुणाचंही वाईट करत नाही, असं आपले संत सांगतात. हेच आप्पासाहेबांनी श्रवण बैठकांमधून सांगितलं आहे. प्रत्येक जण कर्माने स्वत:चे चांगलं किंवा वाईट करतो, याची जाणीव श्रवण बैठकींतून करून दिली जाते. श्रीमत् दासबोधाच्या निरूपणातून समाजसुधारणेचं कार्य करणारे ज्येष्ठ निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या समाजसुधारणेच्या महान कार्याला प्रणाम.

- अविनाश चंदने.

जन्म हा अखेरचा

कायानुग्रहस्थल - ३



शिव हा चित्सागर आणि सुखसागर आहे. चित् म्हणजे ज्ञान. शिव ज्ञानसागर आहे, सर्वज्ञ आहे. भगवान शिवापासूनच सर्व विद्या उत्पन्न झाल्या. समुद्रात अथांग पाणी असते त्याप्रमाणे शिवाचे ज्ञान अगाध असते. समुद्रातले पाणी कधी कमी होत नाही की अधिक. ईश्वराला सागराची उपमा दिलेली आहे. संसाराला देखील सागराची उपमा दिली जाते.

ईश्वर हा ज्ञानाचा व सुखाचा सागर आहे तर संसार हा अज्ञानाचा व दु:खाचा सागर आहे. प्रत्येक मनुष्याला ज्ञान आणि सुख हवे असते. अज्ञान आणि दु:ख कोणालाही नको असते. सर्वांना सुखी आणि ज्ञानी व्हायचे असते. परंतु प्रपंचसंमुख होऊन ज्ञानाची आणि सुखाची प्राप्ती होणे शक्य नाही. ज्याच्या समोर तुम्ही बसता, त्याचा प्रभाव तुमच्यावर पडतो. प्रपंचसंमुख झाल्यावर अज्ञान आणि दु:खच मिळणार आणि ईश्वरसंमुख झाल्यावर ज्ञानाचा आणि सुखाचा लाभ होणार.

शिवयोगी चित्सागर आणि सुखसागर अशा शिवात आपले मन विलीन करतो. तो आपल्या चित्ताच्याद्वारे शिवाशी संबंध जोडतो. त्यामुळे त्याला शिवाचे गुण प्राप्त होतात. सोलापूर शहराला हिप्परगा तलावातून आणि भीमा नदीतून पाणीपुरवठा केला जातो. घरात बसून तुम्ही नळाची तोटी फिरवता. भीमेचे पाणी पडू लागते. नदी खूप दूर आहे. परंतु मोठमोठ्या पाईपांद्वारे नदीशी संबंध जोडून तिचे पाणी घराघरांत पोहोचवले जाते. पाईपलाईनने नदीशी संबंध जोडलेला आहे. असा संबंध नसेल तर तुमच्या घरात पाणी कसे येईल? त्याप्रमाणे आपले चित्त जेव्हा भगवान शिवाशी जोडले जाते तेव्हा त्याचे गुण आपल्या ठिकाणी उतरतात. भगवंताची पूजा करावी, त्याचा नामजप करावा, त्याचे ध्यान करावे हे सारे याचसाठी सांगितले जाते. त्याचे नामस्मरण केल्याने, त्याच्या मूर्तीला स्पर्श करुन पूजा केल्याने आणि त्याच्या निर्गुण-निराकार रुपाचे ध्यान केल्याने त्याच्याशी आपला संबंध जोडला जातो. असा संबंध जोडणे यालाच 'योग' म्हणतात. मनाने, वाणीने आणि शरीराने शिवाशी संबंध जोडला पाहिजे.

(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.

जनमानस

कर्नाटकमध्ये 'अधिवक्ता संरक्षण कायदा' लागू करा

अधिवक्ता कृष्णमूर्ती हे विश्व हिंदू परिषदेचे स्थानिक नेते आहेत. ते कर्नाटकमधील गौरी लंकेश हत्या प्रकरणी मुख्य अधिवक्ता आहेत, तसेच ते हिंदू जनजागृती समिती, सनातन संस्था, स्थानिक हिंदूत्वनिष्ठ यांना नैतिक, धार्मिक आणि कायदेशीरदृष्ट्या पाठिंबा देतात. यामुळेच त्यांना लक्ष्य केले गेले. अधिवक्ता कृष्णमूर्ती यांची हत्या करण्याचे हे षड्यंत्र आहे.

हिंदुत्वासाठी लढणाऱ्यांना आज कुठलेच संरक्षण दिले जात नाही. यासाठी सर्व अधिवक्त्यांना संरक्षण मिळावे, यासाठी कायदा करण्याची मागणी आम्ही मागील ५ वर्षांपासून करत आहोत. कर्नाटक सरकारने त्वरित 'अधिवक्ता संरक्षण कायदा' लागू करावा, अशी मागणी कर्नाटक उच्च न्यायालयाचे अधिवक्ता अमृतेश एन. पी. यांनी केली आहे. या घटनेमागील मुख्य सूत्रधाराला वारंवार जामीन मिळाला आणि सरकारी अधिवक्त्यानेही जामिनास विरोध केला नाही. हिंदुत्वनिष्ठांच्या हत्यांच्या प्रकरणी 'फास्ट ट्रॅक' न्यायालयाच्या माध्यमांतून ही प्रकरणे त्वरित मार्गी लावली जात नसल्याने गुन्हेगारांना कोणतीही भीती राहिलेली नाही. अधिवक्ता कृष्णमूर्तींसारख्या अधिवक्त्यांना सशस्त्र पोलीस संरक्षण दिले पाहिजे. गुन्हेगारांमध्ये भीती निर्माण होईल, असे उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासारख्या नेतृत्वाची आज कर्नाटकला आवश्यकता आहे. तरच कर्नाटकमध्ये हिंदुत्वनिष्ठ यांची हत्या, न्यायाधीशांना धमक्या देणे, हिंदु सणांच्या मिरवणुकींवर दगडफेक करणे असे प्रकार बंद होतील. म्हणून कर्नाटकमध्ये 'उत्तरप्रदेश मॉडेल' लागू केला पाहिजे, असेही गौडा म्हणाले.

यावेळी कर्नाटक उच्च न्यायालयाच्या अधिवक्त्या दिव्या बलेहित्तल म्हणाल्या की, 'आज हिंदु अधिवक्त्यांना लक्ष्य केले जाते. अधिवक्ता कृष्णमूर्ती यांच्यावर आक्रमण करणारा अनुभवी शूटर होता. अधिवक्ता कृष्णमूर्ती यांच्या डोक्यावर गोळी झाडण्यात आली होती; मात्र सुदैवाने ते वाचले. कर्नाटक पोलिसांनी हे प्रकरण गंभीरतेने घेतल्याचे म्हटले आहे; परंतु या प्रकरणी अजूनही कोणालाही अटक झालेली नाही, अशी खंतही अधिवक्ता दिव्या यांनी व्यक्त केली.

- रमेश शिंदे, सोलापूर.

आचरणात सुधारणा घडवूया...

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीकडे अत्यंत डोळसपणे पाहिले. त्याबरोबरच संविधानाच्या सरनाम्यात सूचित करताना समानदर्जाचा आणि समान संधीचा ठळकपणे उल्लेख केला. त्यामुळे कारागीर, बलुतेदार आणि महिलावर्ग यांच्या न्यायाची भूमिका ठळकपणे लोकांपुढे स्पष्ट झाली. परमपूज्य डॉ. बाबासाहेबांनी देशाच्या घटनेत समतेचे, न्यायाचे संवर्धन केले आहे. केवळ मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून दलितांपुरते मर्यादित न राहता अखिल उपेक्षित मानवजातीच्या कल्याणाची आणि संवर्धनाची भूमिका सात्विक विचारांची स्पष्टता विचारात घेऊनच मांडणी केली आहे. त्यामुळे सर्व धरातल्या, सर्व धर्मातल्या, सर्वच प्रदेशातल्या देशाच्या कानाकोपऱ्यातील विचारांचा, कल्पनांचा भारतीय घटनेत समाविष्ट करण्यात आला आहे. सर्वधर्म समभावाची कल्पना अंतर्भूत असल्यामुळे संधीची समानता सांगतानाच दर्जाच्या समानतेचाही बाबासाहेबांच्या कणखर धोरणाचा आग्रह धरून स्पष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे तिची प्रतिष्ठा राखण्याचा पुरेपुर प्रयत्न झाला आहे. संविधानाची अंमलबजावणी करताना क्रिमीलेअरचे धोरण असो अगर दहा वर्षांनी सवलतीचे मूल्यमापन असो हे सर्व अलिप्तपणाने घटनाकारांनी देशहित डोळ्यासमोर ठेवून घटनेची तंतोतंत प्रतिष्ठा राखली आहे. तसेच संविधानाचे तंतोतंत पालन करताना पोलिसांकडून आणि प्रशासनाकडून झालेले नियमन आणि मर्यादांचे दुर्लक्ष त्या चुकांना आडोसा देऊन डोळेझाक करण्यातच काँग्रेस सरकारने धन्यता मानली आहे.

बॅरिस्टर आंबेडकर, बॅरिस्टर सावरकर या दिग्गजांचे जीवन जवळून अभ्यासतांना दोघेही देशभक्त असून समाजापेक्षा राष्ट्रभक्तीचा उमाळा जपताना दोघांनीही अनेक मूल्यांची किंमत मोजली आहे. तर दोघांनीही धर्मसंसदेपेक्षा लोकसंसद अधिक महत्त्वाची आणि मोठी असल्याचे नमूद केले आहे. तसेच लोकसभा हा सुसंस्कृत शब्द देखील दामोदर पुत्राने देशाला बहाल केला आहे. एकूणच रूढी-परंपराबद्दल, धर्माच्या चालिरीतीबद्दल जे मनाला खटकले त्याबाबत आपले मत स्पष्टपणे व्यक्त करताना दोन्ही राष्ट्रभक्तांनी राष्ट्रहित महत्त्वाचे मानले आहे. 'सत्याचे मन केले ग्वाही, नाही मानिले लोकनिंदेला' या तुकारामांच्या धोरणाला डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रसेवा केली आहे. परंतु कुटील कारस्थानाला महाराष्ट्र बळी पडला. परंतु परमपूज्य बाबासाहेबांना सत्येपासून अधिक वेळ दूर ठेवले. तर ब्रिटिशांच्या आडोशाने सावरकरांच्या स्थानबद्धतेला पाठींबा देऊन संवेदनशून्य मनाने निर्णय घेऊन मोकळे झाले. त्यामध्येही वल्लभाई पटेलांची सहानुभूती या दोन बॅरिस्टरांकडे अधिक होती. स्वामी विवेकानंद आणि योगी अरविंद यांनी धर्म सांगताना देखील राष्ट्रहित डोळ्यासमोर ठेवले. देशभक्तीचे भान ठेवले. स्वामी भक्तीचे विवेचन करताना

राष्ट्रहिताची प्रतिष्ठा राखली. दिगंत किर्तीच्या वरील चार विभूतींनी-राष्ट्रभक्तांनी मांडलेली तत्वचिंतनाची भूमिका आम्ही सर्वपुढारी सभा, संमेलनातून, लेखणीतून, समारंभातून तसेच जयंती आणि पुण्यतिथीतून निर्ढावलेल्या मनाने पांढऱ्या कपड्यातून मांत असतो. परंतु प्रभुतींनी या दिग्गजांनी मांडलेली राष्ट्रभक्ती उर बडवून आम्ही सांगत आलो. त्यांचे स्मरण करून विचार मांडत आलो. परंतु व्यक्तीगत जीवनात वावरताना संतांच्या वाणीचा आदर करण्यापेक्षा दिगंत किर्तीच्या विचाराचा जागार करण्यापेक्षा अनुकरण करण्यात आम्ही धन्यता मानायला हवी होती. परंतु बोलण्यापुरते विचार मर्यादित ठेवून व्यक्तीगत जीवनात आम्ही वेगळे वागलो का? याचे जयंतीच्या निमित्ताने चिंतन झाले पाहिजे. समाजात वावरताना थोर विभुतींचे विचार आचरणात आणावे असे अजूनही वाटत नाही. प्रबोधनाच्या वाटेवर चालताना जगणे अधिक सुलभ होते. मित्रांना मदत करून कार्यकर्त्यांना साथ देणे शक्य होते. जिगरबाज मैत्रीची सावली सांभाळता येते. फेसबुक, एसएमएस, व्हॉटस अँप, उपलबध नसताना महात्मा गांधी पासून तुकडोजीपर्यंत आंबेडकर सावरकरांपासून तुकोबा, गाडगे महाराजांपर्यंत तेजोमय विचारांची गंगोत्री वाहती ठेवण्यात समाजकारणाला यश आले. यामधूनच संतांच्या वाणीने समाजाचे मोठे जागरण केले. जयंती कोणत्याही विभूतींची असो, कोणत्याही डोंगराएवढ्या महान व्यक्तीचे पूजन असो, स्मरण असो ते करताना त्यांच्या वाटेवरून आपण चालू शकतो का? हेच सतत समाजसेवकाने चिंतन करायला हवे. स्वतःची छबी घडवण्यासाठी अगर पक्षाची इमेज वाढवण्यासाठी इव्हेंट मॅनेजमेंटकडून कव्हर घालण्यापेक्षा प्रत्यक्षात आपल्या वागणूकीने समाज घडवला पाहिजे. संधी मिळेल त्या ठिकाणी कर्तव्य म्हणून नितीमूल्यं जपायला हवीत. यातच समाजबांधीलकी सामावली आहे.

- प्रा. लक्ष्मण ढोबळे,
माजी मंत्री, प्रांतिक सदस्य,
भाजप, सोलापूर.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळये.

श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त बैठक

अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी उत्सवाच्या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय कार्यालय अक्कलकोट येथे प्रशासकीय अधिकारी,मंदिर समिती आणि अन्नछत्र मंडळ ट्रस्ट यांची बैठक घेण्यात आली. १८ एप्रिल रोजी श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी साजरी होत आहे. त्यानिमित्ताने अक्कलकोट शहरात छोटे -मोठे वाहन मंदिर परिसराकडे येऊन गर्दी करणार नाहीत त्या अनुषंगाने नगरपालिका यांचेकडून अक्कलकोट शहरातील महत्वाच्या ठिकाणी मजबुत स्वरूपाचे बॅरेंगेटिंग करण्यात यावेत असे तसेच मंदिर परिसरातील महत्वाचे ठिकाणी झ सिस्टीम (लाऊड स्पीकर) व्यवस्था करणेबाबत उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांनी सुचना केलेल्या आहेत, त्यावेळी नगरपालिका चे प्रतिनिधी मल्लिनाथ स्वामी यांनी कमलाराजे चौक, फत्तेसिंह चौक, कारंजा चौक, मैंदर्गी नाका,भक्त निवास हत्ती तलाव, समाधी मठ या ठिकाणी लोखंडी स्वरूपाचे बॅरेंगेटिंग लावण्यात येणार असले बाबत सांगितले. विशेष करून मंदिर समिती आणि अन्नछत्र मंडळ यांना, राजेंद्रसिंह गौर यांनी मंदिरातील दर्शन रांग, भाविकांना रांगेत पिण्याची पाण्याची व्यवस्था, उन्हात जास्त वेळ थांबावे लागते त्यामुळे बाहेरील दर्शन रांगेत मंडपची, मॅटिंग, व्यवस्था करण्यात यावी. त्यावेळी मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे आणि अन्नछत्र मंडळाचे प्रमूख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी आपण सांगितले प्रमाणे आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील असे सांगितले. बैठकीला तहसीलदार बाळासाहेब सिरसट,पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे महेश इंगळे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, प्रा. अचलेरे, उपविभागीय कार्यालयाचे धनराज शिंदे, गोपनीय कर्मचारी गजानन शिंदे, हजर होते.

डॉ.आंबेडर जयंती गोगाव येथे साजरी

अक्कलकोट : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त गोगांव (ता.अक्कलकोट) येथे मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रमाचे जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमा पूजन पोलीस उपनिरीक्षक किरण देशमुख व पोलीस अधिकारी प्रल्हाद बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी उपसपंच कल्लुपा बनसोडे हे होते. यावेळी प्रमुख उपस्थिती भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप, शिवशरण सोनकांबळे, तंटामुक्त समिती अध्यक्ष सूर्यकांत जिरगे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष आकाश गायकवाड, पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड, ग्रा.प. सदस्या कलावती गायकवाड, मधुमती गायकवाड, सिध्दाराम मुळजे, शाखा अध्यक्ष लखन गायकवाड,सिध्दाराम गुर्जोटी, सैनिक सिध्देश्वर होटकर, मुख्याध्यापक दयानंद चोळे, बाबासाहेब बनसोडे सर,आरोग्य सेवक सोनटक्के, कृषी अधिकारी शिरगापुरे, जगनाथ सुरवसे,आदी उपस्थित होते.

मिरवणुक उद्घाटन के पी गायकवाड प्रतिष्ठान अध्यक्ष शाम बाबर, किरनळी सरपंच सतीश कणमुसे, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, जयंती उत्सव समितीने अध्यक्ष शांतकुमार बनासोडे, सायबना भांगे, शाम सोनकांबळे अस्लम मुल्ला, मकबूल काळेखा, शिवशरण सोनकांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी धम्म दिप लेझीम संघ, अचलेर, समता संघर्ष लेझीम संघ - आष्टा कासार, पंचशील लेझीम संघ, आलुर, येथील लेझीम संघाने विविध कला दाखवत मिरवणुकीत सहभाग झाले यावेळी मिरवणूक प्रमुख माझी सरपंच परमेश्वर सोनकांबळे, सचिव परमेश्वर गायकवाड, बलभीम बनसोडे, चीतानंद सोनकांबळे यांनी जबाबदारी पार पाडली. धम्म दिप लेझीम संघ, अचलेर (अध्यक्ष - रोहन लोखंडे) समता संघर्ष लेझीम संघ - आष्टा कासार (अध्यक्ष - रवि कांबळे) पंचशील लेझीम संघ, आलुर (अध्यक्ष - सुमित कांबळे) यांचे सत्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले.

नेहरू वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे पाण्यासाठी हातात बादली, टॉवेल, झाडू, घेऊन जिल्हा परिषदेवर आंदोलन

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या नेहरू शासकीय वसतिगृहात मागील. तीन-चार दिवसांपासून पाण्याची सोय नसल्याने विद्यार्थ्यांनी .अंयोळ केली नाही. शेवटी संतापलेल्या विद्यार्थ्यांनी सोमवारी हातात बादली, टॉवेल, झाडू, घेऊन जिल्हा परिषदेत आंदोलन केले. विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाचा यावेळी विद्यार्थ्यांनी निषेध केला.

नेहरू वसतिगृह ते जिल्हा परिषदमधील अंतर विद्यार्थ्यांनी घोषणा देत कापले. विद्यार्थ्यांनी बादली, टॉवेल, झाडू घेत आंदोलनात सहभाग घेतला. बनियन, टॉवेल आदी कपड्यावर जिल्हा परिषदेत ठिय्या मांडला.

आंदोलनातील विद्यार्थ्यांचे म्हणणे असे होते की प्रशासनाने पाण्याचा प्रश्न न मिटवल्यास जिल्हा परिषदेसमोर अंयोळ करणार जिल्हा परिषद प्रशासन विद्यार्थ्यांकडून सरसकट ३ हजार ७०० रुपये वसतिगृहाचे शुल्क आकारले जाते. मात्र, आम्हाला कुठल्याही चांगल्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत परीक्षेच्या काळात आंदोलन करावे लागत असल्याच्या खंत अनेक विद्यार्थ्यांनी यावेळी बोलून दाखवले. सध्या सोलापूर जिल्ह्यातील तापमान ४१ अंश सेल्सिअस आहे. तर दुसरीकडे संपूर्ण हॉस्टेलमध्ये पाण्याचा ठणठणाट आहे अशावेळी अशावेळी विद्यार्थ्यांनी जायचे कुठे तापमानात अंयोळ न करता कसा अभ्यास करायचा, कसा असा सवाल विद्यार्थ्यांनी यावेळी बोलून दाखविला.

सीईओ विद्यार्थ्यांवर चिडले?

आंदोलन करत जिल्हा परिषदेत आलेल्या विद्यार्थ्यांवर सीईओ दिलीप स्वामी चिडले! पाण्याची समस्येबाबत एकदा कल्पना द्यायला हवी होती. आंदोलन करणाऱ्यांपैकी एकदा तरी येऊन सांगायला हवे होते. भेटूनही समस्या दूर झाल्या नसत्या तर तुम्ही आंदोलन करायला हवे होते.

मोटार नादुरुस्त असल्याने पाण्याची अडचण झाली. त्यातच लागोपाठ तीन दिवस सुटी असल्याने त्याकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना नोटीस बजावली असून विद्यार्थ्यांना पाण्याची सोय करण्याचे आदेश देण्यात आली असल्याचे स्वामी यांनी सांगितले.

– दिलीप स्वामी

(मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सोलापूर)

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीमुळे वाहतूक मार्गात बदल

सुराज्य/सोलापूर

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीची सांगता मिरवणूक रविवार, २३ एप्रिल रोजी काढण्यात येणार असून दुपारी एक ते रात्री बारा वाजेपर्यंत मिरवणुकीमुळे वाहतूक मार्गात बदल करण्याचे आदेश पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांनी दिले आहेत.

मिरवणूक मार्ग – मिरवणूक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून सुरुवात होणार असून ती डफरीन चौक, जुना एम्प्लॉयमेंट चौक, वाडिया हॉस्पिटल, चांदणी चौक, महापौर निवास, रेल्वे स्टेशन गांधी पुतळा, भैया चौक, मेकॅनिक चौक, नवीपेठ, दत्त चौक, माणिक चौक, मधला मारुती, मंगळवार पेठ पोलीस चौकी, बाळीवेस मार्गे मिलिंदनगर पंचाची चावडी या ठिकाणी विसर्जन होणार आहे. या मार्गावर मिरवणुकीत सामील होणारी वाहने वगळता इतर सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीस व या मार्गावर वाहन पार्किंगसाठी बंदी राहील.

पर्यायी मार्ग – विजापूर रोडवरुन मंगळवेढ्याकडे जाणाऱ्या वाहनांना पत्रकार भवन चौक ते महावीर चौक, गुरुनानक चौक, संत तुकाराम चौक, अशोक चौक, शांती चौक, जुना बोरामणी नाका, मार्केट यार्ड, शेळगी क्रॉस रोड, जुना तुळजापूर नाका, कारंबा नाका, जुना पुणे नाका, बाळे श्याम ढाबा मार्गे देगाव या मार्गाने वाहतुकीस परवानगी राहील. मंगळवेढ्याकडून येणाऱ्या वाहनांना नवीन देगाव नाका केगाव मार्गे नवीन बायपास रोडने पुणे हायवे, बाळे, जुना पुणे नाका, कारंबा नाका, जुना तुळजापूर नाका, शेळगी क्रॉस रोड, मार्केट यार्ड, हैदराबाद रोड कडे तसेच मंगळवेढ्याहून कर्नाटककडे जाणाऱ्या वाहनांनाही वरीलप्रमाणे मार्केट यार्डपर्यंत येवून पुढे पुणे हायवे ते नवीन विजापूर बायपास रोड या मार्गाने वाहतुकीस परवानगी राहील. रेल्वे स्टेशनहून छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाणाऱ्या वाहनांना रेल्वे स्टेशन, सात रस्ता, रंगभवन चौक, विजापूर वेस, बाकळे प्रेस कॉर्नर, भावसार पथ, समाचार चौक, कोंतम चौक ते कुंभार वेस चौक, बलिदान चौक ते पुढे या मार्गाने वाहतुकीस परवानगी राहील.जुना पुणे नाका व छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडून रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनधारकांनी जुना पुणे नाका ते जुना कारंबा नाका, जुना तुळजापूर नाका, बोरामणी नाका, शांती चौक मार्गे सात रस्ता ते रेल्वे स्टेशन किंवा जुना पुणे नाका ते नवीन केगाव बायपास मार्गे देगावकडून मरिआई चौकी, रामवाडी गोडावून, मोदी स्मशानभूमी मार्गे झाशीची राणी पुतळा, जुळे सोलापूर या मार्गाने परवानगी राहील.

जडवाहतुकीसाठी पर्यायी मार्ग – विजयपूरकडून येणाऱ्या व जाणाऱ्या जडवाहनांनी नवीन बायपास रोडचा वापर करावा, अक्कलकोटकडून येणाऱ्या वाहनधारकांनी नवीन अक्कलकोट नाका, शांती चौक, जुना बोरामणी नाका, मार्केट यार्ड या मार्गाचा वापर करावा. तसेच मंगळवेढ्याकडून येणाऱ्या वाहनधारकांनी नवीन बायपास रोडचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जैन एकता महोत्सवाचा मान कुमठ्याला

सुराज्य/सोलापूर

जगाला अहिंसेचा मार्ग दाखवणारे भगवान महावीर जन्म कल्याण जैन एकता महोत्सव २०२४ चा मान अतिशय क्षेत्र १००८ श्री चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर कुमठे या मंदिर समितीला मिळाला असून मंदिर समितीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला.

संमती सेवा दलाची संस्थापक अध्यक्ष मिहीरभाई गांधी कईवाडी चे अध्यक्ष सुहास शेठ शहा संमती सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष मनीष शहा यांनी हा मंगल कलश कुमठे येथील मंदिर समितीच्या पदाधिकाऱ्याकडे सोपवला.

कुर्डुवाडी येथे आयोजित केलेल्या भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सव सात जिल्ह्यातून एकत्र सकल जैन माज सोलापूर मुंबई पुणे सातारा बीड उस्मानाबाद अहमदनगर येथून उपस्थित होते. या सात जिल्ह्यातून ल्या प्रस्तावा पैकी २०२४ भगवान महावीर जन्मकल्याणक जैन एकता महोत्सव २०२४ सामान कुमठ्याला मिळाला आहे.

पुढच्या भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवासाठी सोलापुरातील सकल जैन समाज व समाजातील विविध सामाजिक संस्था जैन समाजातील सर्व मंदिरे मंदिराचे ट्रस्टी या सर्वांना एकत्र करून हा महोत्सव संपन्न करण्याचे अतिशय क्षेत्र१००८ श्री. चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर समितीचे अध्यक्ष श्याम पाटील सचिव वालचंद पाटील उपाध्यक्ष नितीन कासार यांनी व्यक्त केला आहे यासाठी तीर्थक्षेत्र कमिटीचे अनिल जमगे डॉक्टर महावीर शास्त्रीय रविंद्र कटके देवेंद्र षटकार देशभूषण वसाळे आदींची योगदान लाभणार आहे.

या कामी संमती सेवा दलाचे संस्थापक अध्यक्ष निर्भय गांधी जिल्हाध्यक्ष मनीष भाई शहा व संमती सेवा दलाचे माजी अजित अध्यक्ष यांचे सर्वांचे सहकार्य लाभणार आहे यासाठी प्रथमेश कासार, वैभव पाटील, सचिन कासार, अजित पाटील, अनिल पाटील, युवराज लोखंडे, भाग्येश पाटील महावीर पानपट संदीप पानपट, संजय पानपट, रवी कासार, मनोहर कासार, अभिनंदन विभूते, महेश आहेरकर, ुरेश कासार, चैतन्य कासार, बबन कासार, देवेंद्र कासार, अभिजीत कासार, शितल कासार, सुलचंद लोखंडे, दर्शन लोखंडे, विक्रांत पाटील आनंद पाटील अमोल पाटील, नितीन पाटील, किरण पाटील, गौरव अधणी ओम, पाटील, सोहम पाटील, ओंकार पाटील, महेश पाटील आधी कार्यकर्ते या महोत्सवाच्या कामाला लागले आहेत.

भाजप सरकारला पायउतार करण्याची वेळ आली : डॉ. धवलसिंह

सुराज्य/मोहोळ

आदानी उद्योग समूहा विषयी विचारलेल्या प्रश्नामुळे उद्विग्न झालेल्या नरेंद्र मोदी सरकारने काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यावर सूडबुद्धीने कारवाई केली असल्याचा आरोप करीत येणाऱ्या निवडणुकीत महागाईच्या विरोधात, सर्वसामान्य जनतेच्या अडचणीच्या विरोधात न बोलणाऱ्या भाजप सरकारला पायउतार करण्याची वेळ आली असल्याचे प्रतिपादन सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांनी केले.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यावर सूडबुद्धीने केलेल्या

कारवाईच्या निषेधार्थ तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तालुकाध्यक्ष सुलेमान तांबोळी यांच्या नेतृत्वाखाली मोहोळ तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला.त्यावेळी झालेल्या सभेत डॉ. धवलदादा बोलत होते. यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुलेमान तांबोळी, माजी सभापती बाबासाहेब क्षीरसागर, महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा तथा मोहोळच्या माजी नगराध्यक्षा शाहीन शेख, निरीक्षक विजय हत्तुरे, माजी तालुकाध्यक्ष अशोक देशमुख, देवानंद गुंड-पाटील, भीमराव बाळगे, अभिराज शिंदे, सुधीर लांडे, रमेश हसापुरे, मुन्ना हरणमारे, कांतीलाल राऊत, बिलाल शेख, सुदर्शन आवताडे, शाहीर हावळे, बिलाल शेख भीमराव वसेकर, विजय पवार व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दोघांच्या टोळीला पकडून १६ लाखांच्या २४ दुचाकी जप्त

सुराज्य/मोहोळ

बाजारपेठ व गर्दीच्या ठिकाणावरून होंडाच्या शाईन, युनिकॉर्न यासह इतर महागड्या दुचाकी लॉक तोडून त्या चोरून आणून मोहोळ तालुक्यात त्या कमी किमतीत विकणाऱ्या दोघा जणांच्या टोळीला मोहोळ पोलिसांनी अत्यंत शिताफीने पकडत त्यांच्याकडून १६ लाख २० हजार रुपये किमतीच्या तब्बल २४ दुचाकी जप्त केल्या असून यामुळे चोरीच्या दुचाकी कमी किमतीत येणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार, मोहोळ पोलीस स्टेशन गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुधीर खारगे, पोलीस हेडकॉन्स्टेबल सचिन माने, पोलीस नाईक अमोल घोळवे, पोलीस नाईक प्रवीण साठे, पोलीस कॉन्स्टेबल सिध्दनाथ मोरे, पोलीस कॉन्स्टेबल धीरज काकडे यांचे पथक पोलीस निरीक्षक विनोद युगे यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोळ तालुक्यातील एका चोरीच्या दुचाकींचा तपास करत असताना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सोलापूर जिल्ह्यातील तसेच शेजारील जिल्ह्यातील व कर्नाटक राज्यातील चोरीच्या दुचाकी आणून लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील तावशी येथील पवनराज गुलाब चव्हाण हा चोरीच्या दुचाकी मोहोळ येथे विक्री करण्याकरिता खुतूबुद्दीन अमीन सय्यद रा. धानोरे ता. माढा यांच्याकडे नंबर प्लेट बदलून फायनान्स ची गाडी आहे, असे सांगून विकण्यासाठी देत होता. या तपासासाठी दि. १३ एप्रिल रोजी मोहोळ पोलीस ठाण्याचे पथक औसा येथे दाखल झाले व पवनराज चव्हाण याला अत्यंत सीताफिने सापळा लावून पकडले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता लातूर, सोलापूर, मोहोळ, बीड, अंबाजोगाई, पुणे, पंढरपूर, इंदापूर यासह कर्नाटक राज्यातून दुचाकींची चोरी करून त्या मोहोळ येथे विक्री करण्याकरिता खुतूबुद्दीन अमीन सय्यद रा. धानोरे ता. माढा यांच्याकडे नंबर प्लेट बदलून फायनान्स ची गाडी आहे, असे सांगून विकण्यासाठी देत असल्याचं सांगितले.

त्यानुसार पोलिसांनी वरील दोघांकडून १६ लाख २० हजार रुपये किमतीच्या तब्बल २४ मोटारसायकली जप्त केल्या.

सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, पोलीस निरीक्षक विनोद युगे यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोळ पोलीस स्टेशनच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने केली.

दरोडा घालण्याच्या पूर्वतयारीत असलेले तिघे संशयित जेरबंद

सुराज्य/बार्शी

कटावणी, स्क्रू ड्रायव्हर, एक्साब्लेड, मिरची पावडर या साहित्यासह दरोडा घालण्याच्या पूर्वतयारीत असलेल्या पाच पैकी तिघांना पोलीसांनी पाठलाग करून पकडले तर दोघे अंधाराचा फायदा घेवून पळाले. सोमवार दि. १७ रोजी बार्शी-कुर्डूवाडी रोडवर हॉटेल श्रीप्रसादजवळ पहाटे १.३० च्या सुमारास हा थरार घडला. याबाबत बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पो.कॉ अंकुश जाधव यांनी फिर्याद दिली आहे. त्यावरून संजय भागवत जाधव (रा. शिवम टॉवर कल्याण जि.ठाणे), सुरेश मोहन विश्वकर्मा (रा गोदावरी नगरपालिका ता. गोदावरी सध्या रा. उल्हास नगर गोल मैदान जि.ठाणे), सागरराज नंदराज भेटवाल (रा. तनहु चौक चिसापाणी यंगसिंग (ता. दमोली सध्या उल्हास नगर गोल मैदान जि.ठाणे) यांच्यासह दोन अज्ञात व्यक्ती अशा पाच संशयितांवर गुन्हा दाखल झाला आहे.

दि. १७ रोजी रात्री १.३० वा.चे सुमारास बार्शी शहर पोलीस ठाणेचे पोलीस कर्मचारी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रात्रगस्त घालत असताना शहरानजीक बार्शी-कुर्डूवाडी रस्त्याच्या कडेला हॉटेल श्रीप्रसाद बाजूस टीव्हीएस शोरूमजवळ अंधारामध्ये एक कार (एम एच ४७ के ९८३१) ही लावली होती. त्यामध्ये काही व्यक्ती हे लपून बसलेले दिसले.

पोलिसांना त्यांचा संशय आल्याने ते कारकडे जात असताना संशयित पळून जावू लागले. त्यातील तीन व्यक्तींना पोलीसांनी पाठलाग करून पकडले तर अन्य दोघे अंधाराचा फायदा घेवून पळून गेले.

पकडलेल्या व्यक्तींना त्यांची नावे विचारली असता त्यांनी वरीलप्रमाणे नावे सांगितली. पळून गेलेल्या व्यक्तीबाबत चौकशी केली असता संबंधितांनी उपयुक्त माहिती दिली नाही.

तसेच उडवाउडवीची उत्तरे देवू लागले. पोलीसांनी झडती घेतली असता कटावणी, स्क्रूडायव्हर आदी दरोडा घालण्यासाठी लागणारे साहित्य त्यांचेजवळ आढळले. पोलीसांनी सुमारे ५ लाख रूपये किंमतीची कार ताब्यात घेतली व संबंधितांवर गुन्हा दाखल केला.

गुटखा घेवून जाणारा ट्रक मंगळवेढा पोलिसांनी पकडला

सुराज्य/मंगळवेढा

कर्नाटक राज्यातील निपाणी येथून महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला हिरा पान मसाला गुटखा व सुगंधी तंबाखू अवैध रित्या सांगोला मार्गे सोलापूरच्या दिशेने ३१००८०० रुपयांचा गुटखा घेवून जाणारा ट्रक मंगळवेढा पोलिसांच्या सतर्कतेमुळे पकडला असून या प्रकरणी राजू चंद्रकांत व्होनमाने (वय ५८, रा.सादेपूर), सोमनाथ पुजारी (रा.मंद्रूप), जब्बीउल्ला सय्यद उर्फ रोशन, रफिक उर्फ रसूल मेनन (रा.श्रीरामपूर जि.अहमदनगर) या चौघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, दि.१७ रोजी पहाटे ३.०० वा.मंगळवेढयातील सांगोला नाक्यावरील सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर संशयित वाहनांची तपासणी सुरु असताना एम एच १२ एच डी.७८७६ हा माल वाहतूक ट्रक बाबत पोलिसांनी चौकशी केली असता गाडीत पाठीमागील बाजूस ताडपत्री बांधलेली सोडून पाहिली असता यामध्ये ३१,००८०० रुपये एवढया किमतीचा गुटखा असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.पोलिसांनी ट्रक चालकाकडे हा गुटखा कोठून आणले असे विचारले असता कर्नाटक राज्यातील निपाणी येथून आणून सांगोलामार्गे आला असल्याचे सांगितले. पोलिसांनी ११,०००,०० रुपयांचा ट्रक व ३१,००८०० रुपये किमतीचा गुटखा असा एकूण ४२,००८०० असा पोलिसांनी मुद्देमाल जप्त केला आहे.याची फिर्याद अन्न व औषध प्रशासनचे उमेश भुसे यांनी दिली आहे. ही कारवाई डी.वाय.एस.पी. राजश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरिक्षक रणजित माने यांच्या पथकाने केली.

पंढरपूर रिपाइं महिला पदाधिकाऱ्यांची निवड

सोलापूर : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया महिला आघाडी तालुका पंढरपूर च्या पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली. सोलापूर येथील संपर्क कार्यालयात झालेल्या बैठकी दरम्यान पंढरपूर महिला आघाडी च्या तालुका अध्यक्षपदी सीता कांबळे, उपाध्यक्षपदी गौरी वायदंडे, सविता शिरगीरे, सचिव गोकर्णा कसबे, जनरल सेक्रेटरी ज्योती फराटे, सचिव पिंकू फराटे, संघटक सुषमा पाटोळे, उपाध्यक्ष वैशाली फराटे, सचिव सारिका घाडगे, प्रसिद्ध प्रमुख अनीता मुटकुळे, उपाध्यक्ष निर्मला फराटे, सह संघटक कांचन फराटे, उपाध्यक्ष मनीषा वाघमारे इत्यादी प्रमुख पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षपदी प्रदेश अध्यक्ष सुबोध वाघमोडे होते. कार्यक्रमास जक्कापा कांबळे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष माणिक आठवले, मारुती सोनवले, श्रीमंत गायकवाड, धर्मा माने, सिकंदर शेख, इम्रान शेख, बंटी उबाळे उपस्थित होते. या वेळी महिला आघाडीच्या अध्यक्षा अरुणा सरवदे, पूनम मोरे, अनिता कांबळे याच्यां हस्ते निवडीचे पत्र देण्यात आले.

पद्मश्री भिकुजी इदाते यांचा जनता बँकेतर्फे आज सत्कार

सोलापूर : भटके विमुक्त जाती जमातीचे आयोगाचे माजी अध्यक्ष भिकूजी उर्फ दादा इदाते यांचा मंगळवारी सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे मंगळवार दि.१८ रोजी सायंकाळी ५ वाजता मुख्य कार्यालयात सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी दिली. भटक्या विमुक्त जाती-जमातींसाठी गेल्या अनेक दशकांपासून प्रचंड मोठे सामाजिक कार्य करणाऱ्या भिकूजी तथा दादा इदाते यांना भारत सरकारतर्फे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याबद्दल त्यांचा हा सन्मान सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे करण्यात येणार आहे. दादा इदाते यांनी देशभर पसरलेल्या भटक्या व विमुक्तांसाठी राष्ट्रीय आयोगाची स्थापना करावी यासाठी अखंड प्रयत्न केले. या आयोगाच्या माध्यमातून त्यांनी देशभरातील भटक्या विमुक्तांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या या कार्याबद्दल सोलापूर जनता सहकारी बँकेचे सर्व संचालक मंडळ, कर्मचारी सभासद, ठेवीदार, कर्जदार आणि समस्त सोलापूरकरांच्यावतीने दादा इदाते यांना सन्मानित करण्यात येणार आहे, असे पेंडसे म्हणाले.

अनाथ मुला-मुलींसाठी भारतीय जैन संघटनेतर्फे मोफत सोय

सोलापूर : भारतीय जैन संघटनेने महाराष्ट्र राज्यातील अनाथ मुला- मुलींचे मोफत संगोपन आणि शिक्षण देण्याची जबाबदारी स्विकारली आहे. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी - ६ वी च्या विद्यार्थीनां प्रवेश देण्यात येणार आहे. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनां १२ वी पर्यंतचे शिक्षण, निवास, भोजन, शिक्षण साहित्य, आरोग्य तपासणी आणि औषधे इ.ची मोफत सोय वायोली पुनर्वसन प्रकल्प येथे असणार आहे. प्रवेशासाठी अट : आई किंवा वडील यापैकी एकाचा किंवा दोघांचा मृत्यु कोविड-१९ किंवा शेतकरी आत्महत्या असेल. इयत्ता ५ वी साठी ५० आणि इयत्ता ६ वी साठी ३० मुला-मुलींना प्रवेश देण्यात येणार आहे. इच्छुकांची खालील दिलेला फॉर्म भरून आवश्यक कागदपत्रे जोडून, फॉर्म अध्यक्ष, प्रबंध समिती, भारतीय जैन संघटनेकडे लवकरात लवकर पाठवावा. अधिक माहितीसाठी साळुंखे सर ७७२२०१८५८६, सविता सुतार ९८६०१०५३२६ यांच्याशी संपर्क साधावा.

विवेकवाहिनीमुळे बौद्धिक निर्भयता : भोसले

सोलापूर : माणूस हा प्राणी शहाणा आहे. पण तो आपला मेंदू भोंदूबाबाच्या चरणी अर्पण करतो. स्वत: काही करणं आणि लढणं ही जबाबदारी टाळतो. आळशी बनतो. आज सर्वांनी या मानसिकतेचा त्याग केला पाहिजे. युवकांनी विवेकवाहिनीमध्ये सहभागी होऊन बौध्दिक निर्भयता अंगी बाळगली पाहिजे, असे प्रतिपादन अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या राज्य कार्यकारिणी सदस्या निशा भोसले यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि विवेकवाहिनी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विवेकी विचार - काळाची गरज या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी होते. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, डॉ.अस्मिता बालगावरक, आर. डी. गायकवाड, शंकुतला सुर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते. भोसले म्हणाल्या की, 'माणसांनी विवेक जागृत ठेवला पाहिजे आणि विवेकातून जीवनाकडे पाहिले पाहिजे आणि त्या गोष्टी निरर्थक आहेत. त्यासाठी परंपरा पोकळ आहेत, त्या सोडून दिल्या पाहिजेत. स्वत:हून उत्स्फूर्तपणे काय वाईट आणि काय चांगले आहे, हे जाणून विवेकाने योग्य त्याची निवड केली पाहिजे.' प्रास्ताविक प्रा. डॉ. टी. एन. शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. शंकर राजे यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. राजेंद्र वडजे यांनी मानले. कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थिनींनी बहुसंख्येने उपस्थित होते.

निधन वृत्त

संगवाबाई मुलगे

सोलापूर : बसवनगर येथील संगवाबाई हनुमंतप्पा मुलगे (वय ९२) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.

सावित्रीबाई इगवे

सोलापूर : न्यू पाच्छा पेठ भागातील सावित्रीबाई शंकरराव इगवे (वय ८७) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, सहा मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

अधिकारी आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

सोलापूरकरांचा सवाल पाणी प्रश्न सोडवणार कोण?

सुराज्य/सोलापूर

मागील एक -दोन दिवस शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला. त्यात गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पाऊस यामुळे वीजपुरवठा वारंवार खंडित होत आहे. त्यामुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यात भर म्हणजे आता पाणीप्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. याकडे शहरातील लोकप्रतिनिधी म्हणजेच तिन्ही आमदार व एक खासदार यांचे दुर्लक्ष होत आहे. दुसरीकडे महापालिकेचे अधिकारी उडवाउडवीची उत्तर देत आहेत. त्यामुळे पाणी प्रश्न कोण सोडविणार हा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

गेल्या महिना दोन महिन्यापासून सोलापुरात पाणी प्रश्न चांगलाच भेडसावत आहे. शहरातील अनेक भागात पाच ते सहा दिवसात पाणी येत आहे तर काही ठिकाणी घाणपाणी येत असून काही ठिकाणी पाण्यातून आळ्या येत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. या पाणी प्रश्नावर माजी नगरसेवक आंदोलनाद्वारे आवाज उठवत असले तरी शहरातील खासदार डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख, आमदार प्रणीत शिंदे यांचे दुर्लक्ष होत आह.

आगामी काळात महापालिका निवडणूक होत आहेत. या निवडणुकींत नागरिकांचा रोष आपल्यावर येऊ नये म्हणून माजी नगरसेवक रोज महापालिकेत महापालिका येऊन आयुक्तांना निवेदन देणे, आंदोलन करणे, मोर्चा काढणे आदी बाबी करताना दिसत आहेत. दुसरीकडे शहरातील लोकप्रतिनिधी मात्र पाणी प्रश्नावर कोणतेही भाष्य करताना दिसत नाहीत. उलट सध्या कर्नाटक राज्यात विधानसभा निवडणूक सुरू आहे त्या राज्यात प्रचारासाठी मात्र शहरातील तिन्ही आमदार गुंतले असल्याचे चित्र आहे. आमदार प्रणिती शिंदे या तर कर्नाटकातील सात ते आठ मतदारसंघात प्रचार करत आहेत. आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार सुभाष देशमुख यांनीही कर्नाटक प्रचार दौरा पूर्ण केला आह. तर दुसरीकडे खासदार महास्वामी ही पण शहरातील पाणी प्रश्नावर गप्पच असल्याचे दिसत आहे. त्यामुळे नागरिक या लोकप्रतिनिधींवर नाराज झाल्याचे दिसत आहेत. सध्या महापालिकेवर प्रशासकराज आह. त्यामुळे सर्व कारभार अधिकाऱ्यांच्या हातात आहेत. पाणीपुरवठा विस्कळीत झाल्यास अथवा घाण पाणी आल्यास नागरिकांनी अधिकाऱ्यांना फोन केला तर ते एक तर फोन उचलत नाहीत किंवा उचलले तर उडवाउडवीचे उत्तर देतात, असे आजचे चित्र आह. दरम्यान महापालिका आयुक्तांकडून केवळ पाणीपुरवठा सुरळीत होण्याचे आश्वासनच मिळत आहे. त्यामुळे तिन्ही आमदारांनी आणि खासदारांनी आपापसातील मतभेद आणि पक्षभेद विसरून पाणी प्रश्न एकत्र येऊन महापालिकेतील सर्व अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक बोलवावी अशी मागणी होत आहे.

समांतर जलवाहिनीचा प्रश्नही मिटेना

सोलापूरच्या पाणी प्रश्न तर लोकप्रतिनिधी बोलतच नाहीत तर दुसरीकडे समांतर जलवाहिनी बाबतही तशीच परिस्थिती आहे. पालकमंत्री दर महिना दोन महिन्याला येऊन जलवाहिनी संदर्भात केवळ बैठकाच घेतात. मात्र निर्णय काही होत नाही याबाबत शहरातील आमदारही गप्पच असल्याचे दिसून येत आहे. जलवाहिनीचा प्रश्न कधी सुटणार याचेही उत्तर सोलापूरकरांना मिळेल असे झाले आहे.

पालकमंत्र्यांनाही गांभीर्य नाही

शहरातील पाण्याची अवस्था बिकट आहे. जलवानीचा प्रश्नही अनुत्तरित आहे. आमच्या सविस्तर बातम्या सोशल मीडियाच्या द्वारे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पोहोचत आहेत मात्र त्यांनाही या प्रश्नाचे गांभीर्य नसल्याचे सध्यातरी दिसत आहेत पालकमंत्री झाल्यापासून राधाकृष्ण विखे पाटील दोन महिन्यातून एकदा दौरा करत आहे त्यामुळे प्रश्न मार्गी लागणार तरी कसे असे सोलापूरकर विचारत आहेत.

महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठानतर्फे २५ बसव मूर्तींचे वाटप

सुराज्य/सोलापूर

येथील श्रीशैल हत्तुरे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असणाऱ्या श्री महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठान व सामाजिक संस्थेच्या वतीने सैफुल येथील कुसुमराज मंगल कार्यालय येथे बसव जयंती निमित्त २५ बसव मूर्ती प्रदान समारंभ संपन्न झाला.

माननीय सद्गुरू ष.ब्र श्री शिवपुत्र महास्वामीजी (बसवारुड मठ सोलापूर) यांच्या शुभहस्ते व डॉ. किरण देशमुख यांच्या हस्ते अमर पाटील (जि. प. सदस्य) सिध्दाराम पाटील (शांती एज्युकेशन सोसायटी चेअरमन) अप्पासाहेब पाटील (कृ. उ. बाजार समिती सदस्य) दीपक आर्वे (सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशासन) यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला.

यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त दीपक आर्वे यांनी मनोगत व्यक्त करताना सोलापुरात १२ व्या शतकात सामाजिक क्रांती घडविलेल्या श्री महात्मा बसवेश्वरांची मोठा पुतळा सोलापुरात उभारला हवा असा विचार बोलून दाखविला.

डॉ. मल्लिकार्जुन तरनळी. राजकुमार आरणे, बाबासाहेब बनसोडे. नगरसेविका राजश्रीताई चव्हाण. नगरसेवक वैभव हत्तुरे शिवानंद हिरेमठ यांची उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता यावर्षीचे उत्सव समिती अध्यक्ष चन्नप्पा गुरुभेट्टी, डॉ. बसवराज बगले, खंडू सलगरकर, सागर हत्तुरे, अमित रोडगे, सचिन कोटाणे, सिध्दलिंग मसुती, अजिंक्य उपिन, रितेश किलजे, धर्मराज बक्षी, रवी जवळकोठे, सौरभ पाटील आदींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक मयूर स्वामी यांनी केले.

सूत्रसंचालन शशिकांत वसंतपूरे यांनी केले तर आभार परमेश्वर माळगे यांनी मानले.

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दोन दुचाकी पळवल्या

सुराज्य/सोलापूर

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिवा स्पोर्ट गारमेंट आकाशवाणी केंद्र येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्र.एमएच.१३.बीपी.३४०८ हे अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना १५ एप्रिल रोजी रात्री साडेसात वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी भिमण्णा माणिक पिडगुंडे (वय-३९,रा.नीलम नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल भांगे हे करीत आहेत.

तर दुसरी घटना ही पद्मावती विला सोसायटी जुना विडी घरकुल येथे राहत्या घरासमोर हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्र.एमएच.१३.डीजी.६८६१ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना १० ते ११ एप्रिल दरम्यान पद्मावती विला सोसायटी येथे घडली.याप्रकरणी प्रताप रामदास वल्लाल (वय-४१,रा. पद्मावती विला सोसायटी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पाटील हे करीत आहेत.



संगमेश्वरच्या भूगोल विभागाच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

सुराज्य/सोलापूर

संगमेश्वर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी रविवारी १६ एप्रिलला कॉलेजच्या प्रांगणात जमले होते.१९९५ पासून विविध क्षेत्रात कार्यरत असलेले शेतकरी, प्राध्यापक, शिक्षक, उद्योजक, अभ्यासक, गृहिणी, प्रशासक, पोलीस प्रशासन, वित्त व वितरण विभाग या बहुविध क्षेत्रात कार्यरत विद्यार्थी एकत्र आले होते. प्रत्येकाने आपल्या आठवणीने उजाळा देत संगमेश्वर कॉलेजच्या संस्कारात मोठे झालो असल्याची कृतज्ञ भावना व्यक्त केली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर जिल्हा भूगोल असोसिएशन तर्फे जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित निवृत्त प्राचार्य के. एम. जमादार प्रा.डॉ. नेहा चक्रदेव, प्रा. मधुरा वडापूरकर, माउली महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य दत्तात्रय हरवाळकर यांना निमंत्रित करण्यात आलं होतं.

मेळाव्यास संगमेश्वर गीताने प्रारंभ झाला. प्रारंभी विद्यमान भूगोल विभाग प्रमुख राजकुमार मोहोरकर यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत प्रास्तावित केले. त्यानंतर प्रा.डॉ.दीपक देडे, प्रा.डॉ. दीपक नारायणकर, सौ. दीप्ती इंगळे,प्रा.सौ. बिराजदार,किरण पुजारी, पोलीस हेड कॉन्स्टेबल शहाजी धायगोडे, प्रगतशील शेतकरी अक्षय क्षीरसागर,प्रा संतोष पवार या मान्यवरांनी आपल्या आठवणी सांगत आम्ही कसे घडलो ? आमच्या जडणघडणीत संस्था आणि शिक्षकांचे कसे योगदान आहे हे अधोरेखित केले. भविष्यातील माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याचा आराखडा मांडला गेला.

डॉ.चक्रदेव यांनी तत्कालीन प्राप्त परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यावर विभागाने प्रयत्न केला आणि त्यांना पुढील शिक्षणासाठी मार्गदर्शन केले, असे सांगितले. के. एम. जमादार यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत विद्यार्थी -शिक्षक, आई-वडील, कुटुंब आणि संस्था यातील सहकार्य शिवाय आपली सर्वांगीण प्रगती शक्य नाही. त्यांचे योगदान असल्याने आज तुम्ही इथे उभे आहात. असे सांगत दिलखुलास संवाद साधला.

मधुरा वडापूरकर यांनी कनिष्ठ महाविद्यालय शिकवत असताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या समस्या समजावून घेऊन आम्ही शिकवत गेलो म्हणून आम्हाला आजही ग्रामीण भागातले विद्यार्थी तेवढ्याच तन्मयतेने ओळखतात. त्यामुळे या अध्यापन क्षेत्रात आल्याचे समाधान वाटते असे मनोगतात सांगितले.सूत्रसंचालन प्रा. डॉ. मंजू संगेपाग यांनी केलं तर आभार प्रा.शिरीष जाधव यांनी मानले. प्रा.डॉ.शिवाजी म्हस्के यांच्यासह माजी भूगोल विभागाचे माजी विद्यार्थी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी मुस्लीम ब्रिगेडतर्फे डॉ. आंबेडकरांना अभिवादन

सुराज्य/सोलापूर

भारतीय संविधानाच्या चौकटीत सर्व जातीधर्माच्या मानवाला समान संधी आणि समान हक्क अधिकार स्वाधीन करून हम सब एक है हे तत्व अवलंबिले. त्यामुळेच आज रमजान महिनाचे रोजे असूनही मुस्लिम मावळे मोठ्या संख्येने अभिवादन करण्यासाठी उपस्थित आहेत असे मत छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडचे शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान यांनी व्यक्त केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकातील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले या प्रसंगी मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष नानासाहेब काळे, श्रीकांत डांगे, संतोष पवार, राम गायकवाड, श्रीकांत जाधव, राजन जाधव, भाऊ रोडगे, पोपट भोसले छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष शफीक रचभरे उपाध्यक्ष राजू हुंडेकरी, कादर भागानगरी, अफरोज तांबोळी, तन्वीर गुलजार आदी मान्यवर उपस्थित होते.

साईबाबा विद्यामंदिरात अभिवादन

सोलापूर : साईबाबा शिक्षण प्रसारक मंडळ, शेळगी, सोलापूर संचलित साईबाब विद्यामंदिर दहिटणे व समाधान माध्यमिक प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात करण्यात आली. १४ एप्रिल रोजी ज्ञानाचे प्रतिक असलेले ज्ञानसूर्य, युगपुरुष, विश्वरत्न बोधीसत्व घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांची मनोगते, भीमगीते सादर करण्यात आली.

गर्भलिंगनिदान कायद्याची अंमलबजावणी करावी : स्वामी

सुराज्य/सोलापूर

प्रसूतिपूर्व गर्भलिंगनिदान कायद्याची सर्वांना माहिती होणे आवश्यक आहे. यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तपासणी, प्रशिक्षण व जनजागृती हे तीन मुद्दे विचारात घेऊन काम करावे लागणार असल्याचे प्रतिपादन जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

सोनोग्राफी केंद्र चालक, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स यांची तालुकास्तरावर कार्यशाळा आयोजित करून या कायद्याची संपूर्ण माहिती द्या, असेही ते म्हणाले. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात प्रसूतिपूर्व गर्भलिंगनिदान कायद्यांतर्गत करावयाच्या कारवाईबाबत एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेस मार्गदर्शन करताना सीईओ स्वामी बोलत होते.

यावेळी ॲड. पल्लवी भोळा व डॉ. कुमठेकर यांनी प्रसूतिपूर्व गर्भलिंगनिदान कायद्याची सविस्तर माहिती दिली. यावेळी मातामृत्यू व बालमृत्यू बाबत सविस्तर आढावा घेऊन सूचना देण्यात आल्या.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सोनिया बागडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय पाटील, जिल्हा मोहीम अधिकारी बालकल्याण जावेद शेख, जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ बिरुदेव दुधभाते, सहाय्यक जिल्हा शल्य चिकित्सक डॉ श्रीकांत कुलकर्णी यांच्यासह सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी हे उपस्थित होते.

खड्डे व ड्रेनेज लाईन गळतीमुळे अशुद्ध पाणीपुरवठ्याची शक्यता

लाईन वॉश आउट करण्याचे दिले आयुक्तांनी आदेश

सुराज्य/सोलापूर

महापालिकेच्या विविध जलशुद्धीकरण केंद्रातून शुद्ध पाणीपुरवठा केला जातो मात्र दरम्यान अंतर्गत जलवाहिनी व ड्रेनेज लाईन एकत्र असलेल्या ठिकाणी गळती होऊन अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याची शक्यता आहे. या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या असून काही भागातील लाईन वॉश आउट करण्याचेही आदेश देण्यात आले असल्याची माहिती महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी दिली.

सोलापूर शहरात दमाणी नगर, अवंती नगर, चंडक नगर आदी परिसरात अशुद्ध, गढूळ व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी परिसरातील नागरिकाकडून येत आहेत. दमाणी नगर परिसरात पाण्यात आळ्या निघाल्याच्याही तक्रारी आहेत. दरम्यान, या संदर्भात महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांना विचारले असत असता अशुद्ध पाणीपुरवठ्यासंदर्भात पाणीपुरवठा अधिकारी व संबंधित झोन



अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत. त्या परिसरातील लाईन वॉश आउट करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. या संदर्भात तातडीने कार्यवाही करण्यात येईल, असे महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी स्पष्ट केले.

ज्या परिसरात अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्या ठिकाणी संबंधित अधिकाऱ्यांनी जाऊन पाहणी केलेली आहे. आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. तातडीने या उपाययोजना करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांनी दिले आहेत.

वास्तविक, पाहता महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रांमधून शहराला शुद्ध पाणीपुरवठा केला जातो. दरम्यान अंतर्गत जलवाहिनी व ड्रेनेज लाईन ज्या ठिकाणी एकत्र आले आहे, तिथे ड्रेनेज लाईन गळती होऊन अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याची शक्यता आहे. तसेच काही ठिकाणी खड्डे केल्यामुळे तेथील अशुद्ध पाणीही येऊ शकते. यामुळे या संदर्भात तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत, असेही त्यांनी सांगितले.

डिप्लोमा युथ फेस्टिवलमध्ये स्वेरी महाविद्यालयाचे यश

पंढरपूर : इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन (आयएसटीइ) व इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (आयइआय) यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूरमध्ये नेहरूनगरमधील शारीरिक शिक्षण महाविद्यालयात डिप्लोमा युथ फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले होते. या युथ फेस्टिव्हल मध्ये सोलापूर जिल्हयातील विविध महाविद्यालयांनी सहभाग येतला होता. या उपक्रमांतर्गत झालेल्या विविध स्पर्धांमध्ये स्वेरी संचलित डिप्लोमा इंजिनिअरिंग महाविद्यालयाने यवयवीत यश संपादन केल्यामुळे सर्वत्र कौतुक होत आहे. स्वेरीने वार्षिक परीक्षांचे निकाल, प्रवेश येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आणि प्लेसमेंटमधून निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या याबाबत सातत्यपूर्ण आयाडी टिकवली आहे. आता यात आणखी भर पडली असून विविध क्रीडा प्रकारांत देखील स्वेरी सातत्याने यशस्वी होत आहे. विद्यार्थिनींनी बास्केटबॉल खेळात विजेतेपद मिळवले तर ४०० मीटर या खेळात उपविजेतेपद मिळवले. तसेच वैयक्तिक खेळामध्ये ४०० मीटर रनिंग या खेळात निकिता विजय जाधव यांनी प्रथम क्रमांक मिळवला. सांस्कृतिक स्पर्धे त ग्रुप डान्स, म्युझिकल स्किट व रांगोळीमध्ये द्वितीय क्रमांक मिळाला. स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ यांच्या नेतृत्वाखाली क्रीडा विभागाचे समन्वयक प्रा.आकाश पवार, प्रा.सुरज पवार व सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. अजिंक्य देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज प्रा. एम.एम.पवार, प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी यशस्वी खेळाडूंचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त सम्राट विचार मंचच्यावतीने रक्तदान

चिखली : मोहोळ तालुक्यातील पेनूर येथील सम्राट विचार मंच यांच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त रविवार दि.१६ एप्रिल रोजी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. शिबीराचे उद्घाटन ग्रामपंचायत सदस्य गिरीश गवळी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्रिसरण पंचशील येऊन अभिवादन करण्यात आले. प्रत्येक रक्तदात्यास प्रमाणपत्र आणि भेटवस्तू देण्यात आली. या शिबीरासाठी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांचे सहकार्य लाभले. यावेळी माजी ग्रा.पं.सदस्य राजेंद्र आवारे,पंकज आवचारे, शिवाजी आवारे, काकासाहेब आवारे, प्रकाश सोनटक्के, संजय ओहोळ,विनोद आवारे, दादाराव राजगुरु, सचिन माने, केशव पवार, नितिन आवारे, सौरभ आवारे, आण्णासाहेब आवारे, गौरव आवारे, जय आवारे, प्रणव आवारे, यशवंत आवचारे, सचिन गवळी, सुदेश आवचारे, पांडुरंग चवरे, गणेश चवरे, रशिद निंबाळकर, पोपट माळी, आनंद आवारे, आर्यन ओहोळ, निलरत्न आवारे, मुज्जफर मुजावर, अर्जुन कदम, सतिश आवचारे, आप्पा फाळके, अजय गायकवाड, जितेंद्र राजगुरु आदींसह बहुसंख्य पदाधिकारी उपस्थित होते.

प्रबुद्ध मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे रक्तदान

सांगोला : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवानिमित्त महूद(ता.सांगोला) येथील प्रबुद्ध मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीन रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.या शिबिरात सुमारे ७० रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिराचे उदघाटन माजी सरपंच बाळासाहेब ढाळे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी जिल्हा दूध संघाच्या माजी संचालक विलास पाटील,ह्.मारुती ढाळे, अंकुश येडगे, संजय जाधव,प्रकाश येडगे,रावसाहेब डोंगरे, शंकर पाटील, डॉ.शरद नागणे,डॉ.कांबळे,डॉ. विनायक बागल,राजेंद्र देशमुख, शशिकांत महाजन,कैलास खबाले, अनिकेत महाजन,प्रा.माणिक पाटील,विजयसिंह पाटील आदी उपस्थित होते.सांगोला येथील रेवनील रक्तपेढीच्या सहकार्याने येण्यात आलेल्या या शिबिरामध्ये सुमारे ७० रक्तदात्यांनी रक्तदान केले. संस्थेच्या वतीने सर्व रक्तदात्यांना पाण्याचा जार भेटवस्तू देण्यात आली.रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी उमेश खरात, बाबासाहेब सरतापे,हणमंत बाबर, दयानंद सरतापे,उध्दव सरतापे,संदीप बाबर,पिंटू सरतापे,जयंत बाबर, सुहास बाबर,नाथा सवणे,विकास सरतापे यांच्यासह प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या सदस्यांनी परिश्रम येतले.

सांगोला विज्ञान महाविद्यालयात क्रीडा स्पर्धांचे आयोजन

सांगोला : विज्ञान महाविद्यालय सांगोला येथे सालाबाद प्रमाणे यावर्षी जिमखाना देवाक वितरण सोहळा निमित्त विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. यावर्षीच्या स्पर्धा मोठ्या उत्साहात आणि खेळाडूंच्या भरघोस प्रतिसादात सुरू आहेत यामध्ये महिलांच्या करिता दुरी उडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते तर पुरुष व महिलांच्यासाठी बुध्दिबळ स्पर्धा तसेच खो-खो व कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते सध्या विज्ञान प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेला सुरुवात झालेली आहे. महाविद्यालयाचे जिमखाना विभागाचे माजी खेळाडू अमृत शेंबडे व हरी माने सतीश कोळी हे नुकतेच महाराष्ट्र राज्य पोलीस दलामध्ये भरती झालेले आहेत त्यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिकंदर मुलानी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. शंकरराव धसाडे व प्राध्यापक बाळकृष्ण कोकरे ज्येष्ठ शारीरिक शिक्षण संचालक व स्पर्धा आयोजक प्रा.विजय पवार व प्रा. संतोष लवटे व महाविद्यालयातील खेळाडू उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर
Classified
पाहिजेत
गरजुंना कायमची कामाची व राहण्याखाण्याची सोय, लॉजमध्ये कायम राहणास कामगार पाहिजेत.
मो.9373980171
(190423)

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आपला शब्द पडू देत नाहीत : आ.पाटील

आमदार व खासदार आपल्या दारी उपक्रमांतर्गत नाझरे गावास दिली भेट

सुराज्य/सांगोला

बुद्धेहाळ तलावाचा टेंभू योजनेत समावेश केला असून लवकरच तेथे पर्यटन स्थळ करू व श्री दत्त मंदिरास तीन ते चार कोट रुपये देऊन तेथेही पर्यटन स्थळ म्हणून विकसित करू. यासाठी मी स्वतः व खासदार रणजीतसिंह निंबाळकर रात्रंदिवस काम करून निधी कमी पडू देणार नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस आपला शब्द पडू देत नाहीत. सर्वांनी सहकार्य करा विकासासाठी आम्ही दोघे मागे राहणार नाही. याची ग्वाही देतो, असे मत आमदार शहाजीबापू पाटील यांनी नाझरे येथे गाव भेट दौऱ्यात व्यक्त केले.

सांगोल्यास उजनीचे पाणी देणारे पहिले खासदार रणजितसिंह निंबाळकर असून आमदार शहाजी बापू यांनी कोट्यावधीचा निधी आणून विकास केला तसेच मुस्लिम समाज दर्ग्यास मोठा निधी व इदगाह मैदानासाठी ही मोठा निधी देऊन विकास कामात कमी नाही हे दाखवून दिले. येथील मान नदीवर मोठा पूल करावा असे मत शिवसेना नेते दादासो वायमोडे यांनी व्यक्त केले तसेच श्री दत्त मंदिर पर्यटन स्थळ म्हणून निवड करा असे मत भाजपा नाझरे अध्यक्ष नंदकुमार रायचुरे यांनी सांगितले.पाण्यासाठी साठ वर्षे तालुक्यात ससा दाखविला परंतु आता असे होणार नाही, असे मत शिवसेना तालुकाध्यक्ष दादासो लवटे यांनी व्यक्त केले. मतदान बघून विकास नाही मत नाही तरी विकास करणारे खासदार व आमदार आहेत तसेच श्री दत्त मंदिरास पंधरा लाखाची तरतूद केली आहे असे मत भाजपा तालुकाध्यक्ष चेतन सिंह केदार यांनी व्यक्त केले. सांगोला तालुक्याचा एकमेव भाग्यविधाता म्हणजे शहाजी बापू पाटीलचः खा. निंबाळकर बापू लाता है तो छप्पर फाडके म्हणजे आम्ही सध्या ज्या ज्या गावात गेलो त्या प्रत्येक गावात बापूंनी काम आणले असे दिसत आहे. याचे कारण मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री बापूचा शब्द पडू देत नाहीत. सर्वात जास्त निधी आणणारा आमदार म्हणून शहाजीबापू पाटील आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने सांगोला तालुक्याचे एकमेव भाग्यविधाते आहेत तसेच मी स्वतः व आमदार यापुढेही विकासासाठी कमी पडणार नाही, असे मत खासदार रणजीत सिंह निंबाळकर यांनी व्यक्त केले. या प्रसंगी जि प सदस्य अतुल पवार, शिवसेना नेते सागर पाटील, युवा अध्यक्ष गुंडा खटकाळे, सरपंच नवनाथ बनसोडे, उपसरपंच गणीसोकाजी, ग्रामपंचायत सदस्य के आर वायमारे, जीवन कांबळे, हरी पाटील, राजू खरात, मंगेश, सचिन वायमारे, आनंदा बनसोडे, भैय्या वायमोडे, अमोल विभुते, रशीद काजी, दादासो खरात, युवा नेते अजय सरगर, साहेबराव शिंदे, पांडुरंग मिसाळ, तात्यासो शिंदे, रमेश पाटील, मुकुंद पाटील, अण्णासो पाटील, तानाजी काटे उपस्थित होते.

कुसमोड ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी धायगुडे तर उपसरपंचपदी मदने बिनविरोध

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील कुसमोड ग्रामपंचायतीच्या सरपंच व उपसरपंच निवडीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी रणसुंभ यांच्या अध्यक्षतेखाली सर्व ग्रामपंचायत सदस्यांची कुसमोड ग्रामपंचायत कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी सरपंचपदासाठी महावीर उर्फ पुरुषोत्तम पांडुरंग धायगुडे व तुषार माधव लवटे यांचे अर्ज आले होते तर उपसरपंच पदासाठी स्वाती नाथा मदने यांचा एकमेव अर्ज आला होता. सरपंच पदासाठी तुषार लवटे यांनी भरलेला अर्ज मायारी येतल्याने सरपंच पदी महावीर धायगुडे यांची तर उपसरपंचपदी स्वाती मदने यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी रणसुंभ यांनी जाहीर केले. या निवडीवेळी माजी सरपंच तुषार लवटे, माजी उपसरपंच राणी पवार, ग्रामपंचायत सदस्य शहाजी लेंगरे,बाळकृष्ण धायगुडे, रेखा पालखे, शारदा धायगुडे हजर होते तर उमा कचरे गैरहजर राहील्या. निवडीनंतर नुतन सरपंच व उपसरपंच यांचा माजी सरपंच व उपसरपंच यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सदर निवडीवेळी मनोहर लवटे, डॉ सुरेश सातपुते, तानाजी शेंडगे, भिवा शिंदे, लक्ष्मण पवार, माजी उपसरपंच संजय पाटील, गोपाळ माळी, शहाजी लेंगरे, उत्तम मोरे, अनंता धायगुडे, अशोक लेंगरे, नाथा मदने, शशिकांत यडयाळे, गणेश लेंगरे, सोमनाथ वायमारे, अशोक राजगे, नितीन मोरे, सुभाष जाधव, देवा धायगुडे, कैलास धायगुडे, सिध्देश्वर पाटील, विजय धायगुडे गुरुजी,किशोर लवटे, श्याम धायगुडे, उमाजी बोडरे, देवानंद चव्हाण, अशोक चव्हाण, बापु धायगुडे, शिवाजी धायगुडे, यांच्यसह अनेक मान्यवर ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडीनंतर नुतन सदस्यांनचा सत्कार करण्यात आला तसेच फटाक्यांची आतषबाजी व गुलालाची उधळण करण्यात आली. सर्व निवडणुक प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी रणसुंभ, सहहयाक ग्रामसेवक कोरबु याच्या अध्यक्षतेखाली शांततेत पार पडली.दरम्यान यावेळी माळशिरस पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक राजेंद्र टाकणे याठिकाणी भेट देऊन पाहणी केली. तर त्यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सतीश धुमाळ व इतर सहकाऱ्यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

कॅनॉलच्या खड्ड्यात ट्रॅक्टर पलटी, तरूणाचा दुदैवी मृत्यू

सोलापूर : कॅनॉलच्या खड्ड्यात ट्रॅक्टर पलटी झाल्याने बांधकाम करणार्या मिस्त्रीचा दुदैवी मृत्यू झाला. ही घटना रविवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास वडाळा (ता. उ. सोलापूर) येथे घडली. लक्ष्मण (अबु) भुजंग देवकर (वय ३५) असे मयत तरूणाचे नाव आहे. दरम्यान, रविवार १६ एप्रिल रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथे गावापासून थोड्याच अंतरावरील उजनी कॅनॉलच्या उप फाटयाच्या खड्ड्यात ट्रॅक्टर पलटी झाला. उपचारासाठी दाखल केले मात्र उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला.

मंत्रालयाच्या येथे निबंध स्पर्धेत जान्हवी जानकर यांचे यश

वेळापूर : महाराष्ट्र मंत्रालयाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात निबंध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचा नुकताच निकाल जाहीर करण्यात आला आहे.

या स्पर्धेत वेळापुर धानोरे गावच्या रहिवाशी व महाराष्ट्र राज्य मंत्रालय येथे सामान्य प्रशासन विभागात सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणुन कार्यरत आसणाऱ्या जान्हवी रामचंद्र जानकर यांनी प्रथम क्रमांक मिळवला आहे. जानवी जानकर यांचा निबंध स्पर्धेत यश मिळाल्याबद्दल १ मे कामगार दिनी यादिवशी त्यांचा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सन्मान होणार आहे. जान्हवी जानकर यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचे बंधू माळशिरस पंचायत समितीचे माजी उपसभापती उत्तमराव जानकर, वेळापुर माजी सरपंच सौ विमलताई जानकर, धानोरे माजी सरपंच जीवन जानकर, पोपटराव जानकर , डॉ. धनंजय जानकर, नामदेव देवकते, राजाभाऊ देवकते, भाऊसाहेब जानकर, विठ्ठल देवकते, वेळापूर ग्रामपंचायत सदस्या डॉ. सौ. स्नेहलताई जानकर, इंजिनीयर सचिन जानकर, अमोल डोंबाळे, काकासो रणवरे, राजू घोरपडे, मोहन जगताप, हनुमंत कदम यांनी अभिनंदन केले आहे.

अनुदानासाठी १६९ कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे अर्ज

२० एप्रिल अंतिम मुदत, अर्ज करण्याचे आवाहन

पंढरपूर : राज्य शासनाच्या निर्णयानुसार १ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत विक्री केलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येणार आहे. पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये १७ एप्रिलपर्यंत १६९ कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी ८ हजार ८३२ क्विंटल कांद्यासाठी अनुदान मागणी केली आहे, अशी माहिती देऊन पंढरपूर तालुका कृषि उत्पन्न बाजार समितीचे सचिव कुमार घोडके यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी दिनांक २० एप्रिल २०२३ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन केले आहे.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ३५० रुपये प्रति क्विंटल व जास्तीत-जास्त २०० क्विंटल प्रत्येक शेतकरी याप्रमाणे अनुदान देण्यात येणार आहे. याची अंमलबजावणी पणन संचालकांच्या मदतीने बाजार समिती करणार आहे. त्यासाठी बाजार समितीतर्फे विनामूल्य अर्ज देण्यात येत आहेत. अनुदान अर्जासोबत विक्री केलेल्या कांदा विक्रीची मूळ पट्टी, कांदा पिकाची नोंद असलेला सातबारा उतारा, बँक पास बुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत, कांदा व विक्री पट्टी मुलांच्या अथवा अन्य कुटुंबियांच्या नावे अशा प्रकरणामध्ये सहमती असणारे शपथ पत्र जोडणे आवश्यक आहे. कृषि उत्पन्न बाजार समिती पंढरपूर येथील समितीच्या कार्यालयामध्ये १ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत विक्री केलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी वरील कागदपत्रांसह दिनांक २० एप्रिल २०२३ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहनही सचिव घोडके यांनी केले आहे.

कारखान्याच्या लोखंडी नाईफची चोरी ; तिघांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

कारखान्यातील उसाच्या कटिंगसाठी वापरण्यात येणारे एकूण सहा लोखंडी नाईफ (यंत्र) तीन जणांनी चोरून नेल्याची घटना दि.१६ एप्रिल रोजी रात्री अडीच वाजण्याच्या दरम्यान सिध्देश्वर साखर कारखाना येथे घडली.

याप्रकरणी राजकुमार शिवानंद उमराणी (वय-३९, रा.मठ गल्ली, मुपो, होटगी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून निलेश राम कजागवाले, उमेश सुनील जमादार व सुमित सिताराम कजागवाले (सर्व.रा.लोधी गल्ली, लष्कर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सिध्देश्वर कारखान्याच्या आत असणारे लोखंडी स्क्रॅप सामान मधून साखर कारखान्यातील उसाच्या कटिंगसाठी वापरण्यात येणारे सहा लोखंडी नाईफ हे वरील तियांनी दुचाकीवर येऊन मुद्दामून लबाडीने चोरी करून येऊन जात असताना तरुण भारत प्रेससमोर त्या दुचाकीवर आलेल्या इसमांचा अपघात झाल्याचे समजले. तरी वरील तियांनी कारखान्याचे सहा लोखंडी नाईफ चोरी केले आहे.वरील संशयित तिघा इसमांची नावे फिर्यादीस पोलिसांकडून समजले. असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक गायकवाड हे करीत आहेत.

तीन शेतकऱ्यांच्या १३ शेळ्या चोरीला

सांगोला : सांगोला शहरातील बनकर मळ्यातील तीन शेतकऱ्यांची अंदाजे ६९ हजार रुपये किमतीचे १३ शेळ्या, बोकडे, पाट, अशी जनावरे अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना रविवार रात्रीच्या सुमारास घडल्याने शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत नंदकुमार शंकर बनसोडे याने सांगोला पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली. रविवारी रात्री झोपताना तारेचे कंपाउंड चे गेट बंद करून झोपी गेलो सकाळी उठून कंपाउंड मध्ये पाहिले असता बारा शेळ्या पैकी तीन मोठ्या शेळ्या अंदाजे किंमत अठरा हजार रुपये, चार मोठी बोकडे अंदाजे प्रत्येकी पाच हजार रुपये किमतीचे वीस हजार रुपये व दोन पाट प्रत्येकी पाच हजार रुपये किमतीचे दहा हजार रुपयाचे एकूण ४८ हजार रुपये किमतीचे नऊ शेळी बोकडे व पाट चोरीस गेले तसेच शेजारी चौकशी केली असता सचिन सुभाष बनकर यांचे १५००० रुपये किमतीचे तीन पाट, व गणेश खंडू बनकर यांचे सहा हजार रुपये किमतीची एक शेळी असे एकवीस हजार रुपये किमतीचे चार शेळी व पाट चोरीला गेल्याची फिर्याद सांगोला पोलीस स्टेशनमध्ये दाखल केली असून पुढील तपास सांगोला पोलीस करीत आहे

आ.सुभाष देशमुख यांचा पाठपुराव्याला यश

अल्पसंख्याक विभागाकडून ७५ लाखांचा निधी मंजूर

सुराज्य/सोलापूर

दक्षिण तालुका विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुभाष देशमुख यांच्या पाठपुराव्यानंतर राज्याच्या अल्पसंख्याक विकास विभागाच्या वतीने शहरातील मुस्लिम बहुल भागासाठी सुमारे ७५ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीमधून रस्त्यांचे डांबरीकरण करणे, संरक्षक भिंत बांधणे, पाईप लाईन टाकणे यासह विविध विकासकामे होणार आहेत. मतदार संघातील मुस्लिम बहुल भागात विकास कामे करण्यासाठी आमदार सुभाष देशमुख यांनी शासनाकडे निधीची मागणी केली होती.

मुस्लिम बहुल भागात होणार विकासकामे

याबाबत त्यांनी शासन स्तरावर पाठपुरावा केला होता. अखेर त्याला यश आले असून अल्पसंख्याक विकास विभागाच्या वतीने सुमारे ७५ लाखांचा निधी प्राप्त झाला आहे. या निधीमधून प्रभाग २० मधील शिवगंगा नगर भाग २ येथील जहिर अब्बास नदाफ घर ते बी.डी. कारखानापर्यंत रस्ता करणे, प्रभाग २० अंबिका नगर ३ रिजवन पिरजादे घर ते महिबूब तांबोळी घरापर्यंत रस्ता करणे, प्रभाग २० शिवगंगा नगर भाग १ येथील इरफान गुगी घर ते नूरजहा मुस्ताक शेख घरापर्यंत रस्ता करणे, प्रभाग २० - शिवगंगा नगर भाग १ येथील अबू हनिफा मस्जिद ते रियाज नदाफ घरापर्यंत रस्ता करणे, प्रभाग २० विजय नगर येथील नबीलाल लष्करी घर ते महमद हिजवाले घरापर्यंत रस्ता करणे, प्रभाग २० भीमाशंकर नगर येथील सुफिन चौधरी घर ते मोहसीन शेख घरापर्यंत रस्ता करणे, प्रभाग २५- मजरेवाडी येथील महाबुबी शौकत अली मुस्लिम कब्रस्थान या दोन एकर जागेत संरक्षक भिंत बांधणे, प्रभाग २५- मजरेवाडी येथील महाबुबी शौकत अली मुस्लिम कब्रस्थान मध्ये स्ट्रिट लाईट बसविणे, प्रभाग २० भीमाशंकर नगर येथील महिबूब जागीरदार घर ते मतिन शेख घरापर्यंत पिण्याची पाईप लाईन करणे, प्रभाग २०- भीमाशंकर नगर येथील रशिद शेख घर ते रफिक पटेल घरापर्यंत पिण्याची पाईप लाईन करणे, प्रभाग २०- भीमाशंकर नगर येथील सोहेल शेख घर ते फव्या अन्सारी घरापर्यंत पिण्याची पाईप लाईन करणे, प्रभाग २० भीमाशंकर नगर येथील रमजान शेख घर ते समीर सय्यद घरापर्यंत पिण्याची पाईप लाईन करणे, प्रभाग २० भीमाशंकर नगर येथील गुलाम रसूल घर ते मवला ईनामदार घरापर्यंत पिण्याची पाईप लाईन करणे आदी कामे होणार आहेत.

निमित्त पुरस्कार सोहळ्याचे, चर्चा अजिदादांच्या बंडखोरीची

शहांच्या मुंबई भेटीची इनसाईड स्टोरी

सुराज्य/मुंबई

महाराष्ट्रात काही महिन्यांपूर्वी मोठी राजकीय उलथापालथ होऊन सत्तांतर झाले. शिवसेनेत उभी फूट पडली आणि उद्धव ठाकरे यांचे मुख्यमंत्रिपद जाऊन एकनाथ शिंदे भाजपच्या मदतीने राज्याचे मुख्यमंत्री झाले. मात्र या सत्तांतरानंतरही राज्यातील स्थिती अस्थिर असून महाराष्ट्रातील जनतेला राजकीय भूकंपाचा नवा अंक अनुभवण्यास मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. यावेळी राजकीय भूकंपाचा केंद्रबिंदू हा शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असू शकतो, असे बोलले जात आहे. कारण राष्ट्रवादीचे नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची दिल्ली येथे भेट घेतल्याची चर्चा आहे. तसेच अमित शहा यांनी झालेल्या मुंबई दौऱ्यात राष्ट्रवादीतील एका गटाला सत्तेत सामावून घेण्याबाबत आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा केल्याचे समजते.

खरंतर अमित शहा हे आप्पासाहेब धर्माधिकारी यांना जाहीर झालेला महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यासाठी महाराष्ट्रात आले होते. मात्र, रविवारी हा पुरस्कार प्रदान सोहळा असताना शहा हे शनिवारी रात्रीच मुंबईत दाखल झाले.

मुंबईत आल्यानंतर त्यांनी पक्षातील नेत्यांना विश्वासात घेत नव्या राजकीय समीकरणांची माहिती दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचा एक मोठा गट फोडण्यासाठी शहा यांनी हालचाली सुरू केल्या असल्याचे खात्रीलायकरीत्या समजते.

आमच्या पक्षातील काही सहकाऱ्यांवर पक्षांतरासाठी दबाव असल्याचे राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी कबूल केल्याचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर अमित शहा यांच्याकडून राष्ट्रवादीचा एक गट फोडण्यासाठी प्रयत्न सुरू असण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादीतून फुटणाऱ्या गटात कोण कोण असेल, त्याचे नेतृत्व कोण करेल तसेच त्याला सत्तेतील वाटा कशाप्रकारे देता येईल याची चाचपणी अमित शहा यांनी मुंबई दौऱ्यादरम्यान केल्याची माहिती आहे.

भाजपला का हवी राष्ट्रवादीची साथ?

शिवसेनेतील ऐतिहासिक फुटीनंतर महाविकास आघाडीची ताकद क्षीण झाल्याचा दावा भाजपकडून करण्यात येत होता. मात्र अशा स्थितीतही भाजपला आता राष्ट्रवादीची किंवा तेथील एका गटाची साथ का हवी आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मात्र, त्याचं

कारण आहे आगामी लोकसभा निवडणुका आणि महाविकास आघाडीने निर्माण केलेलं आव्हान. लोकसभा निवडणुकांना जेमतेम वर्षच उरल्याने त्यादृष्टीने केंद्रातील भाजपच्या नेतृत्वाने रणनीती आखायला सुरुवात केली आहे. राज्यात लोकसभेच्या ४८ जागा असून मागच्या लोकसभा निवडणुकीत त्यातील ३५ जागा भाजप-शिवसेना युतीने जिंकल्या होत्या.

केंद्रातही शिवसेना भाजपसोबत असल्याने त्यांच्या खासदारांचा पाठिंबा होता. मात्र, आता उद्धव ठाकरेंची शिवसेना सोबत नसल्याने त्यांच्याशिवाय राज्यात पुन्हा तेवढेच किंवा त्यापेक्षा जास्त खासदार निवडून आणणे हे भाजपसमोर मोठं आव्हान आहे आणि राज्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस अशा तीन पक्षांची महाविकास आघाडी बनली असून त्यांनी या आव्हानामध्ये अधिक भर घातली आहे. अशावेळी लोकसभा निवडणुकीपूर्वी ही आघाडी कोणत्याही परिस्थितीत भाजपला फोडायची असून त्यासाठीच राष्ट्रवादीमधील आमदारांचा एक मोठा गट गळाला लावण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. स्वत: अमित शहा यांनी यासाठी पुढाकार घेतला असून त्यासाठी आवश्यक ती सर्व बोलणी त्यांनी केल्याचे समजते.

विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना मात्र यासंबंधीची कोणतीच कल्पना भाजपकडून देण्यात आली नसल्याचंही समजते. दरम्यान, एकीकडे भाजपकडून या हालचाली सुरू असताना मी अमित शहा यांची भेट घेतली नसल्याचा दावा अजित पवार यांनी केला आहे. त्यामुळे आगामी काळात महाराष्ट्रात खरंच राजकीय भूकंप होणार का आणि असा भूकंप झालाच तर त्याचे स्वरूप नेमके कसे असणार, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे.

संजय राऊतांचे सूर बदलले?

सुराज्य/मुंबई

महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सध्या अस्थिरतेचे ढग निर्माण झाले आहेत. कारण राष्ट्रवादीचे नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार हे भाजपच्या संपर्कात असल्याचं बोललं जात आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनीही आपली भूमिका मांडली होती. अजित पवार यांच्या भूमिका बदलाविषयी सुरू असलेल्या चर्चेवर त्यांनी परखडा खुलासा करायला हवा, अशी अपेक्षाही संजय राऊत यांनी व्यक्त केली होती. मात्र रविवारी अशी भूमिका मांडणाऱ्या राऊतांचा सूर सोमवारी काहीसा बदलल्याचं पाहायला मिळालं आणि त्यांनी अजित पवार हे राष्ट्रवादी सोडून जातील, असं वाटत नसल्याचं ठामपणे म्हटलं आहे.

'केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर करून दबाव टाकत शिवसेना फोडण्यात आली आणि हे सरकार तयार करण्यात आलं. त्याच पद्धतीचा दबाव राष्ट्रवादीच्या काही नेत्यांवर टाकला जात आहे.

राष्ट्रवादीच्या काही आमदार आणि नेत्यांवर धाडी टाकणं, त्यांच्या कुटुंबियांना धमकावणं

आणि आमच्यासोबत या असं सांगणं सध्या सुरू आहे. अजित पवार रविवारी आमच्यासोबत महाविकास आघाडीच्या सभेत व्यासपीठावर होते. आमचा त्यांच्याशी संवाद झाला आहे. नागपुरातून मुंबईत येताना आमच्यासोबत विमानातही ते होते. त्यामुळे ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सोडून वेगळ्या दिशेने जातील, असं मला अजिबात वाटत नाही,' असं संजय राऊत म्हणाले.

अहमदनगरच्या शेतकऱ्याचे पुढचे पाऊल

- पिवळ्या कलिंगडाची शेती
- राज्याबाहेर मोठी मागणी

सुराज्य/अहमदनगर

एका तरुण शेतकऱ्याने आधुनिक पद्धतीने शेती करत सर्व शेतकऱ्यांसमोर आदर्श ठेवला आहे. टाकळीमानुर येथील युवा शेतकरी संदीप रोडे यांनी त्यांच्या दीड एकर शेती क्षेत्रामध्ये पारंपारिक शेतीला फाटा देत आधुनिक पद्धतीने फळ शेती केली आहे.

या दीड एकर शेत जमिनीमध्ये कलिंगडाच्या आरोही, सरस्वती आणि विशाला या तीन जातीच्या कलिंगडाचं उत्पादन घेतलं आहे. या तीनही जातीच्या कलिंगडाचे रंग वेगवेगळे असून पिवळ्या रंगाचं कलिंगड आतून लाल आहे. तर हिरव्या रंगाचं कलिंगड आतून पिवळ्या रंगाचा असतं. दीड एकर कलिंगडाची शेती करण्यासाठी त्यांना साधारण ७० ते ८० हजार रुपये खर्च आला आहे. या शेतीमधून साधारणत: ४० ते ४५ टन इतकं उत्पादन मिळेल, अशी शेतकऱ्याला आशा आहे. युवा शेतकरी पहिल्या प्रयोगात यशस्वी, दोन महिने केलेल्या कष्टाचं चीज झालं, टरबूज शेतीतून ७ लाख कमावले शेतकऱ्याने ॲग्री फाईन या कंपनीबरोबर करार केला असून कंपनी त्यांच्याकडून मार्केटच्या किमतीपेक्षा चार ते पाच रुपये किंमत जास्त देऊन माल खरेदी करणार आहे. तसंच या कलिंगडाला पुणे, मुंबई, औरंगाबाद, बेंगलोर या ठिकाणी मॉलमध्ये मोठ्या प्रमाणात मागणी आहे. मनू सिड्ससचे तिनं कलिंगड हे आरोही, विशाला आणि सरस्वती असे आहेत. आरोही या वाणाचे कलिंगडवरून काळं आणि आतून पिवळा गर असलेलं आहे. याची चव अननसासारखी असून पाणीदार फळ आहे. विशाला या वाणाचे कलिंगडवरून पिवळं आणि आतून लाल गर असलेलं आहे.

इतर कलिंगडापेक्षा हे जास्त गोड आहे. तर सरस्वती या वाणाचे कलिंगड वरून हिरवंगार आणि



आतून लाल गर असलेलं आहे.

ॲग्रीफाय कंपनीमार्फत शेतकऱ्यांना बियाणे आणि रोप दिलं जातं. कंपनी मार्फत कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग केलं जातं. तसंच उत्पादन विक्री सुध्दा कंपनीमार्फत केली जाते. बाजार भावापेक्षा ४ ते ५ रुपये भाव वाढवून दिला जातो त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होतो. सध्या महाराष्ट्रात कंपनी मार्फत ३५ शेतकऱ्यांनी शेती केली आहे. पुढील वर्षी कंपनीमार्फत २०० ते ३०० शेतकरी जोडले जातील. अहमदनगर जिल्ह्यातील संदीप रोडे हे कंपनी बरोबर जोडले गेलेले पहिले शेतकरी आहेत.

श्री सेवकांचा मृत्यू, धर्माधिकारींकडून शोक व्यक्त

सुराज्य/मुंबई: ज्येष्ठ निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी श्री सेवकांचा उष्मायाताने झालेल्या मृत्यू बद्दल शोक व्यक्त केला आहे.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा लाखो श्रीसेवकांच्या उपस्थितीत रविवारी पार पडला होता. त्यावेळी उष्मायाताने १३ श्रीसेवकांचा मृत्यू झाल्याने पुरस्कार सोहळ्याला गालबोट लागले. त्यानंतर या कार्यक्रमाच्या जंगी आयोजनावर प्रश्न उपस्थित होऊ लागले. श्री सेवकांचा झालेला हा मृत्यू क्लेषदायक आहे. या घटनेवर कोणीही राजकारण करू नये, असे आवाहनही आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी केले.

केजरीवाल दोषी आढळले तर शिक्षा झालीच पाहिजे : हजारे

सुराज्य/अहमदनगर

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यासह आपल्यासोबत असलेल्या सहकाऱ्यांना त्यावेळी आपण चांगला सल्ला देत होतो. तेव्हा एक दिवस असा गेला नाही की मी त्यांना शुद्ध आचारण ठेवण्याचा सल्ला दिला नाही. तरीही पुढे त्यांनी मार्ग बदलला. आता त्यांच्यावर ही वेळ आली आहे. दिल्ली सरकारच्या मद्य गैरव्यवहाराची सीबीआय चौकशी करीत आहे. यात मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल दोषी आढळल्यास त्यांना शिक्षा झालीच पाहिजे', असे मत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी व्यक्त केले.

दिल्ली सरकारने मद्य विक्री धोरणात घेतलेल्या निर्णयात घोटाळा झाल्याच्या आरोपांची चौकशी सुरू आहे. यामध्ये दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना आधीच अटक झाली आहे. आता केजरीवाल यांनाही सीबीआयने चौकशीसाठी बोलाविले आहे. केजरीवाल आणि सिसोदिया यांच्या आम आदमी पक्षाची स्थापना हजारे यांच्या आंदोलनातून झाली आहे. त्यावेळी केजरीवाल हे हजारे यांचे शिष्य मानले जात होते.

काँग्रेसचे सरचिटणीस वेणुगोपाल मातोश्रीवर

सुराज्य/मुंबई

काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी सोमवारी (१७ एप्रिल) मुंबईत मातोश्रीवर येऊन शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यानंतर दोघांनीही पत्रकार परिषद घेत या भेटीमागील उद्देश सांगितला. तसेच भाजपावर हल्ला चढवला. यावेळी उद्धव ठाकरेंनी भाजपाबरोबरच्या २५ वर्षांच्या युतीचाही उल्लेख केला.

उद्धव ठाकरे म्हणाले, आजच्या आमच्या भेटीमागील उद्देश वेणुगोपाल यांनी अत्यंत मोजक्या, नेमक्या आणि स्पष्ट शब्दात सांगितला आहे. मी त्यांचं मातोश्रीत स्वागत करतो. त्यांच्याबरोबर महाराष्ट्र काँग्रेसचे सर्व नेते आहेत. देशाचा प्रश्न मोठा आहे. केवळ विरोधी पक्षांचं समीकरण असा हा मुद्दा नाही. देशात जे मीकरण' सुरू आहे त्याविरोधात समीकरण तयार होतंय.

प्रत्येक पक्षाची विचारसरणी आहे. ती असायलाच हवी. त्यालाच तर लोकशाही म्हणतात. ती लोकशाही जिवंत ठेवण्यासाठीच आम्ही एकत्र आलो आहोत. दिवसांमागून दिवस चालले आहेत. निवडणुकींना आता एक वर्षही राहिलेलं नाही. निवडणुका आपल्यासमोर उभ्या आहेत. मधल्या काळात भाजपा अध्यक्ष नड्डा मुंबईत येऊन बोलून गेले. ते म्हणाले की, सर्व पक्ष संपतील आणि एकच पक्ष राहील. हाच एक मोठा धोका सर्व पक्षांना निर्माण झाला आहे, उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, भाजपाने शिवसेनेचा घात करण्याचा प्रयत्न केला. शिवसेनेत गद्दारी घडवून आणली. ते आणखी काही पक्षांमध्ये गद्दारी घडवून आणत आहेत.

समलैंगिक विवाह कायद्याला केंद्राकडून पुन्हा विरोध

सुराज्य/नवी दिल्ली : समलैंगिक विवाहाला कायदेशीर मान्यता मिळावी याकरता सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. परंतु, या कायद्याला केंद्र सरकारने विरोध केला आहे. समलैंगिक विवाहामुळे समाजाच्या नितीमूल्यांना

मोठी हानी पोहोचू शकेल असं केंद्राने आधी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटलं होतं. केंद्राने सर्वोच्च न्यायालायता रविवारी पुन्हा प्रतिज्ञापत्र सादर केलं असून, समलैंगिक विवाह म्हणजे केवळ शहरी विचारधारा असून ही विचारधारा सर्वांनाच मान्य नसेल, असं म्हटलं आहे. दरम्यान, समलिंगी विवाह कायद्यासाठी आलेल्या याचिकेवर सुनावणी घेण्याकरता सर्वोच्च न्यायालयाने ५ न्यायाधीशांचं घटनापीठ स्थापन केलं आहे.

शिंदे सरकारवर राज ठाकरे यांची खडसून टीका

मुंबई : महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला असला तरी या सोहळ्याला गालबोट लागलं आहे. या सोहळ्यात उपस्थित असलेल्या आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या श्री सदस्यांचा उष्मायात झाला. या कार्यक्रमात उष्मायातामुळे मृत्यू पावलेल्या श्री सदस्यांचा आकडा १२ पर्यंत पोहोचला आहे. या घटनेवरून आता राज्याचं राजकारण तापलंय. विरोधकांनी राज्य शासनावर जोरदार टीका केली आहे. ही घटना समोर आल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यानंतर उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, अजित पवार यांच्यासह अरविंद सावंत आणि विनायक राऊत हे देखील एमजीएम रुग्णालयात पोहोचले. यापाठोपाठ दुसरीकडे मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी आधी ट्वीट करून आणि नंतर प्रत्यक्ष रुग्णालयात जाऊन रुग्णांची चौकशी केली.

श्रीसदस्यांच्या जाण्याने मन जड झाले : अमित शहा

मुंबई : नवी मुंबईतील खारघर येथे पार पडलेल्या महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्याला गालबोट लागलं आहे. या सोहळ्यात उपस्थित असलेल्या आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या श्रीसदस्यांचा उष्मायात झाला. या कार्यक्रमात उष्मायातामुळे मृत्यू पावलेल्या श्रीसदस्यांचा आकडा १२ पर्यंत पोहोचला आहे. या घटनेवरून राजकारण चांगलंच तापलं असून राजकीय वर्तुळातून विविध प्रकारच्या प्रतिक्रिया समोर येत आहे. यावेळी श्रीसदस्यांच्या जाण्यानं माझं मन जड झालंय, असं ट्विट केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी करत संवेदना व्यक्त केल्या आहेत. 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्याला उपस्थित असताना उष्मायाताने प्राण गमावलेल्या श्रीसदस्यांच्या जाण्याने, माझे मन जड झाले आहे. मृतांच्या कुटुंबियांप्रती मी संवेदना व्यक्त करतो. जे लोक उपचार घेत आहेत ते लवकरात लवकर बरे व्हावेत यासाठी मी प्रार्थना करतो, असं अमित शाह ट्विटद्वारे म्हणाले.'

रोहित पवारांचे संवेदनशील रूप

मुंबई : राजकीय व्यक्ती नेहमी आक्रमक भाषण करताना, विरोधकांवर हल्लाबोल करताना दिसतात. आंदोलनं आणि मोर्चांमध्ये तसेच सभांमध्ये नेते मंडळींचं आक्रमक रूप आपल्याला पाहायला मिळतं. परंतु काही नेतेमंडळी खासगी आयुष्यात खूप संवेदनशील असतात. कुटुंबावरील एखाद्या संकटाच्या काळात काही नेत्यांची हळवी बाजू समोर येते. तर काही नेते प्राणी आणि पक्ष्यांप्रती खूप संवेदनशील असल्याचं पाहायला मिळतं. कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवारांची देखील अशी संवेदनशील बाजू नुकतीच पाहायला मिळाली.

राज्यात अवकाळी पावसामुळे अनेक ठिकाणी शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. राज्यातले अनेक आमदार, मंत्री तसेच इतर नेतेमंडळी सध्या अवकाळीमुळे झालेल्या नुकसानाची पाहणी करताना दिसत आहेत. आमदार रोहित पवार यांच्या मतदार संघात म्हणजेच कर्जत-जामखेडमध्ये देखील पिकांचं नुकसान झालं आहे. त्यामुळे रोहित पवारांनी त्यांच्या मतदार संघातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली.

आधुनिक 'फॅक्टर्स' अजूनही कोसो दूर

हिमोफिलियाग्रस्तांना अपंगत्वासह जीवाचा धोका कायम

सुराज्य/संभाजीनगर

हिमोफिलियाग्रस्तांना सरकारी रुग्णालयांमधून पारंपरिक फॅक्टरचा पुरवठा होत असला तरी सतत द्यावा लागणाऱ्या पारंपरिक फॅक्टरमुळे शिक्षणासह स्वावलंबी होण्यात कितीतरी गैरसोयी निर्माण होतात व अपंगतत्वासह जिवालाही धोका संभवतो.त्याऐवजी आधुनिक स्वरुपाचे फॅक्टर फार कमी द्यावे लागतात आणि हे फॅक्टर सर्वार्थाने प्रभावी असल्याने जगभरात वापरले जातात. असे आधुनिक फॅक्टर भारतातही उपलब्ध झाले असले तरी सरकारी रुग्णालयांमधून आधुनिक फॅक्टर मिळत नसल्याची वस्तुस्थिती कायम आहे.

हे फॅक्टर उपलब्ध करून हिमोफिलियाग्रस्तांचे जगणे सुसह्य करावे, अशी हाक हिमोफिलिया सोसायटीने सोमवारी (१७ एप्रिल) पाळण्यात आलेल्या जागतिक 'हिमोफिलिया दिना'निमित्त दिली आहे.

हिमोफिलिया हा रक्ताचा जनुकीय आजार असलेल्या रुग्णांमध्ये जीवघेणा किंवा अपंगत्व निर्माण करणारा रक्तस्राव कधीही होऊ शकतो आणि त्यामुळेच अशा रुग्णांना आयुष्यभर फॅक्टर आठ किंवा नऊ देणे अनिवार्य असते. हे फॅक्टर अशा रुग्णांच्या शरीरात तयार होत नाहीत किंवा त्यांची कमतरता असते, म्हणूनच ते बाहेरून द्यावे लागतात. हे फॅक्टर न दिल्यास अशा रुग्णांमध्ये रक्त गोठण्याची क्रिया होत नाही आणि त्यामुळे सांधे, स्नायू व मऊ उतींमध्ये (सॉफ्ट टिश्यूज) वारंवार रक्तस्राव होऊ शकतो, ज्यामुळे सांध्यांचे तीव्र नुकसान होऊन अपंगत्व येऊ शकते किंवा मेंदू, मान, घसा किंवा शरीरातील आतड्यांमध्ये रक्तस्राव होऊन रुग्णाला प्राण गमवावा लागू शकतो.

छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात वरील दोन्ही फॅक्टर उपलब्ध करण्यात आले आहेत. मात्र पारंपरिक फॅक्टर हे रुग्णांना अगदी वारंवार देण्याची गरज असते आणि त्यामुळे अशा सर्व रुग्णांच्या शिक्षणापासून ते करिअरपर्यंत सर्व गैरसोयी होतात. अशा रुग्णांना वेळप्रसंगी रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आल्यास पुन्हा शैक्षणिक किंवा आर्थिक नुकसान होते. सतत फॅक्टर घ्यावे लागत असल्याने असे रुग्ण सामान्य आयुष्य जगू शकत नाहीत, याकडे हिमोफिलिया सोसायटीने

लक्ष वेधले आहे. या स्थितीवर केवळ विदेशात नव्हे तर भारतातही पर्याय निर्माण झाला आहे आणि पारंपरिक ऐवजी आधुनिक स्वरुपाचे फॅक्टर सर्वत्र उपलब्ध झाले आहेत. आधुनिक फॅक्टरला जनमान्यताही मिळाली आहे आणि त्यांचा सर्वत्र वापरही सुरू झाला आहे. या प्रकारच्या नवीन फॅक्टरचा पुरवठा आपल्या देशात आणि देशातील सर्व जिल्ह्यांमध्ये व्हावा, अशी मागणी 'हिमोफिलिया फेडरेशन ऑफ इंडिया'कडूनही सातत्याने होत आहे. मात्र या मागणीकडे कानाडोळा केला जात असल्याची टीकाही फेडरेशनकडून होत आहे. या संबंधीचे पत्र मराठवाडा विभागातील हिमोफिलिया सोसायटीनेही काही महिन्यांपूर्वी आरोग्य विभागातील उच्चपदस्थांकडे दिले आहे.

खर्च वाढण्याची शक्यता नाहीच

पारंपरिक फॅक्टर जास्त प्रमाणात द्यावे लागतात व अगदी दिवसातून दोन फॅक्टर सलग काही दिवस देण्याची वेळ येते, तर आधुनिक फॅक्टर आठवड्यातून एकदा किंवा दोन द्यावे लागू शकतात. त्यामुळे आधुनिक फॅक्टरची किंमत जास्त असली तरी प्रमाण कमी असल्याने खर्चात फार मोठी वाढ होणार नाही. त्या उलट आधुनिक फॅक्टरच्या वापरामुळे हिमोफिलियाग्रस्त रुग्ण कमीत कमी धोक्यासह अधिकाधिक सामान्य जीवन जगू शकतात, याकडेही संघटनेने लक्ष वेधले आहे.

खासगी खर्च आवाक्याबाहेर

आधुनिक फॅक्टर खासगीत उपलब्ध असले तरी त्यांची किंमत खूप जास्त आहे; म्हणजेच केवळ एका डोससाठी १० ते १२ हजार रुपये किंवा त्यापेक्षा जास्त मोजावे लागू शकतात. त्यामुळे हा खर्च बहुतेकांच्या आवाक्याबाहेर आहे, असेही संघटनेचे म्हणणे आहे.

'डे केअर सेंटर' कार्यरत व्हावेत

हिमोफिलियाग्रस्त रुग्णांवरील छोट्या-मोठ्या उपचारांसाठी तसेच आपत्कालिन उपचारांसाठी स्वतंत्र 'डे केअर सेंटर' उपलब्ध करण्यात यावेत, अशीही मागणी या दिनानिमित्त पुढे येत आहे. असे डे केअर सेंटर काही जिल्ह्यांमध्ये सुरू झाले आहेत; परंतु अनेक जिल्ह्यांत असे सेंटर उभे राहणे बाकी असल्याचेही समोर येत आहे.

स्वामी समर्थ विकास पॅनलचे निर्विवाद वर्चस्व

विरोधकांचे डिपॉझिट जप्त

सुराज्य/अक्कलकोट

संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीत स्वामी समर्थ शेतकरी विकास पॅनलचे प्रमुख माजी आमदार सिद्रामप्पा पाटील व विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या भारतीय जनता पक्षाचे निर्विवाद वर्चस्व सिध्द झाले असून, तालुका शिवसेना प्रमुख संजय देशमुख यांच्या नेतृत्वाखाली स्वामी समर्थ शेतकरी बचाव पॅनलचा दारुण पराभव झाला. यामध्ये अक्कलकोटच्या माजी नगराध्यक्षा डॉ.सुवर्णा मलगोंडा, राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुनिल बंडगर, कोळीबेटचे माजी सरपंच व बाजार समितीचे माजी संचालक प्रकाश दुपारगुडे यांच्यासह अन्य तीन जणांचे डिपॉझिट जप्त झाले आहे.

सहकारी संस्थेवर सिद्रामप्पा पाटील यांचेच वर्चस्व

सिद्रामप्पा पाटील हे तालुक्यातील सहकार क्षेत्रात गेल्या पाच दशकापासून दबदबा कायम आहे. ८५ वर्षे सिद्रामप्पा पाटील हे आजही सहकार क्षेत्रावर सत्ता कायम ठेवू शकले.

ये तो ट्रेलर है... पिक्चर अभी बाकी है

अक्कलकोट तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या तीन सहकारी संस्थांच्या निवडणुका लागल्या होत्या. त्यापैकी साखर कारखाना निवडणुक संपन्न झाली. यामध्ये आजी-माजी आमदारांनी बाजी मारली. साखर कारखाना निवडणूकीचा हा ट्रेलर आहे. अक्कलकोट व दुधनी बाजार समिती निवडणूक म्हणजे पिक्चर अभी बाकी आहे, असे साखर कारखान्याचे नूतन संचालक अप्पासाहेब पाटील यांनी सांगितले.

एकाच घरातील तीन संचालक

सिद्रामप्पा पाटील हे सुलेरजवळगे मतदारसंघातून व त्यांचे पुत्र दिलीप पाटील हे देखील याच गटातून अविरोध झाले तर सहकारी संस्था मतदारसंघातून संजीवकुमार पाटील हे विजयी झाले आहेत. संचालक पदाची हॅट्रीक करणारे सिद्रामप्पा पाटील हे जिल्ह्यात एकमेव ठरले आहेत.

संस्था प्रतिनिधी मतदारसंघातून साखर कारखान्याचे विद्यमान संचालक संजीवकुमार पाटील यांना ४२ पैकी ४१ मतांनी विजयी होवून सहकारी संस्थेमध्ये सिद्रामप्पा पाटील यांचे वर्चस्व सिध्द झाले आहे. निकाल लागताच माजी आमदार सिद्रामप्पा पाटील व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे अभिनंदन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सहकारमंत्री अतुल सावे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आदींनी अभिनंदन केले. निकाल बाहेर येताच कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष करुन गुलालाची मुक्त उधळण करीत जल्लोष साजरा केला. दरम्यान रविवारी अक्कलकोट तालुक्यातील ४५ मतदान केंद्रावर २९.१% टक्के मतदान झालेले होते. या अगोदर स्वामी समर्थ शेतकरी विकास पॅनलचे १३ उमेदवार बिनविरोध निवड झाले होते.

सिद्रामप्पा पाटील, बसलिंगप्पा खेडगी, विश्वनाथ भरमशेट्टी, अप्पासाहेब पाटील, दिलीप पाटील, भिमाशंकर धोत्री, उत्तम वायमोडे, महेश पाटील, दिलीप शावरी, देवेंद्र बिराजदार, अभिजित सवळी, संजीव अंबाजीप्पा पाटील, श्रीमंत कुंटोजी आदींचा बिनविरोध निवड झालेली आहे. सोमवारी सकाळी श्री कमलाराजे चौकातील प्रियदर्शिनी मंगल कार्यालयातील मतमोजणीस प्रारंभ झाला. प्रारंभी सहकारी संस्था मतदारसंघाचा निकाल लागला. यामध्ये संजीवकुमार पाटील हे ४१ मताची विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी संजय पांढरे यांना स्वत:चे मत पडले आहे. याबरोबर उर्वरित पाच गटातील उमेदवारांचा देखील दारुण पराभव झाला आहे.

महिला मतदारसंघातून गिरीजा भिमाशंकर विजापुरे ५ हजार १०० मते (विजयी), महानंदा चंद्रशेखर निंबाळ ५ हजार १७५ (विजयी) तर डॉ. सुवर्णा मलगोंडा ५०० (पराभव), रुक्मिणीबाई भिमाशंकर मदने ३८५ (पराभव), अनु.जाती, जमाती : शिवप्पा मारुती बसरगी ५ हजार ३०६ (विजयी), प्रकाश मसा दुपारगुडे ३%४ (पराभव), श्रीमंत शिवलिंगप्पा देसाई १३४ (पराभव), इतर मागास वर्ग : मल्लिकार्जुन महादेव बिराजदार ५ हजार ३४० (विजयी), प्रशांत विश्वनाथ गुरव ३%३ (पराभव), जाफर अप्पाभाई जमादार १०४ (पराभव), भटक्या विमुक्त जाती जमाती विशेष मागास : ब्रह्मनाथ भुताळी घोडके ५ हजार ३२९ (विजयी), भिमाशंकर बिरप्पा निंबाळ ९% (पराभव), सुनिल शिवाजी बंडगर ३९१ (पराभव) स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या गेल्या २५ वर्षापासून माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांचे वर्चस्व आहे. यंदाच्या निवडणुकीत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची पाटलांना मोलाची साथ लाभल्याने आगामी अक्कलकोट व दुधनी बाजार समितीच्या निवडणुका देखील जिंकूच असा निर्धार भाजपा कार्यकर्त्यांनी केला आहे.

श्री बसव प्रतिष्ठानतर्फे १७६ जणांचे रक्तदान

रक्तदान केल्याशिवाय दुसऱ्या व्यक्तीचा जीव वाचवता येत नाही : जयगुरू शांतलिंगाराध्य महास्वामीजी

सुराज्य/अक्कलकोट

या जगात शास्त्रज्ञांनी मोठ-मोठ्या आजारांवर औषधांचे शोध लावले आहेत. मात्र रक्त तयार करण्यावर कोणालाही साध्य झाले नाही, यामुळे रक्तदान केल्याशिवाय दुसऱ्या व्यक्तींचा जीव वाचवू शकता येत नाही, त्यामुळे रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे, असे प्रतिपादन हिरेजेवर्गी मठाचे मठाधीपती श्री. ष.ब्र. जयगुरूशांतलिंगाराध्य महास्वामीजी यांनी केले.

ते दुधनी येथे अक्षय तृतीया व महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त श्री बसव प्रतिष्ठान दुधनी यांच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिराच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी बोलत होते. रक्तदान शिबिराचे उद्घाटन महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतीमा पूजन व दीपप्रज्वलन जयगुरू शांतलिंगाराध्या महास्वामी यांच्या हस्ते करून स्वामीजिंच्या रक्तदानाने करण्यात आले. यावेळी हेडगेवार रक्त पेढीचे जनसंपर्क अधिकारी दिलीप बनसोडे, डॉ. सुशील वायमारे, प्रकाश कोंडा, सुनील हरारे, अमृता चव्हाण, बसव प्रतिष्ठानचे अध्यक्ष मल्लिनाथ येगदी, उपाध्यक्ष उमेश सावळसुर, भीमाशंकर अल्लापुर, अनंत कासार, चंद्रशेखर खंडाळ, संतोष जोगदे, विश्वनाथ गंगावती, मल्लिनाथ मातोळी, इरय्या पुराणिक, अंबण्णा निंबाळ, दौलत हौदे, संजय नुला, प्रशांत पादी, शांतलिंग परमशेट्टी, संगीता मेंथे, राहुल म्हस्के, पार्वती कोळी, बसवराज देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती. या रक्तदान शिबिरात १७६ रक्तदात्यानी रक्तदान केले. या रक्तदान शिबिराचे रक्त संकलन हेडगेवार रक्त पेढीने केले. रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी शांतलिंग वागदरी, दत्तात्रय पोतदार, गुरुशांत वडेयार, सातलिंग अल्लापुर, बसवराज मालगत्ती, दौलत भांजी, महेश माळगे, सैदप्पा जानकर, गोलु ठक्का, राजशेखर परमशेट्टी, सिध्दाराम कण्णी, चंद्रशेखर माशाळ, शुभम मातोळी, बसवराज मिरकल, अनिल भाविकट्टी, शरण येगदी, विशाल खंडाळ, विनोद झुलपे, भागेश यळसंगीसह समस्त बसव भक्तांनी परिश्रम घेतले.

मुस्लिम बांधवांनी दिला 'एकतेचा' संदेश

रमजान महिन्याचा रोजे सुरू असताना देखील मुस्लिम समाजातील समाज बांधवांनी रक्तदान करून एकतेचा संदेश दिला. दुधनी मुस्लिम युवक समाज बांधवांनी रक्तदाना बरोबर पिण्यासाठी पाण्याची बाटल्याची व्यवस्था देखील करून दिली. यामध्ये जिलानी नाकेदार (मुस्लिम समाज अध्यक्ष दुधनी) हमीद बडेखा, हबिब बळूरगी, महेदीमिया जिडगे, मेहराजहसन जिडगे, आजम शेखजी, युसुफ शेख, नजीम बळूरगी, इस्माईल गुलबर्गा या तरुनांचा समावेश होता.

समृद्ध जीवनशैलीसाठी परोपकारी निसर्गाचे महत्त्व ओळखा : डॉ.मेतन

नेचर वॉकच्या निमित्ताने संगमेश्वरच्या विद्यार्थ्यांशी संवाद

सुराज्य/सोलापूर

देतो तो निसर्ग राखतो तो माणूस या उक्तीप्रमाणे देणाऱ्या निसर्गाचे अस्तित्व अबाधित राखण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. भविष्यातील समृद्ध जीवनशैलीसाठी परोपकारी निसर्गाचे महत्त्व ओळखा.'' असे सांगत सोमवारच्या प्रसन्न सकाळी निसर्गप्रेमी, प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ, (वाईल्ड लाईफ फोटोग्राफर) वन्यजीव छायाचित्रकार, पक्षी जगताचे अभ्यासक डॉ.व्यंकटेश मेतन यांनी संवाद साधला.

ते संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या ' नेचर वॉक ' उपक्रमात बोलत होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे आदी उपस्थित होते.

प्रारंभी सर्व विद्यार्थी संमती कट्ट्याजवळ एकत्र जमले. त्यानंतर प्रा. डॉ.विठ्ठल अरबाळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर डॉ. मेहता यांनी विद्यार्थ्यांशी नेचर वॉक, हेरिटेज वॉक , मानवी जीवनशैली या विषयावर संवाद साधला. विद्यार्थ्यांना परोपकारी समृद्ध निसर्गाचे महत्त्व सांगितले. आपल्या अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी कॉलेजच्या वतीने सुरू केलेल्या उपक्रमास शुभेच्छा दिल्या भविष्यात असेच विद्यार्थी केंद्री उपक्रम राबवण्यात येतील असे सांगितले. त्यानंतर रात्र प्रा. सोनाली गिरी यांनी शिवयोगी सिध्दरामेश्वर परिसरातील मंदिरे , वास्तू याविषयी तसेच भुईकोट किल्ल्यातील महत्त्वाच्या संदर्भांचा आढावा येत विद्यार्थ्यांसोबत वास्तू निरीक्षण केले. शिवयोगी सिध्दरामेश्वरांच्या ऐतिहासिक कार्याची ही माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. याप्रसंगी कला शाखेतील प्रा.शंकर कोमुलवार, प्रा.दत्तात्रय गुड्डेवाडी, प्रा. शिवराज देसाई, प्रा.प्रकाश कतनळी, प्रा.हर्षवर्धन पाटील, प्रा.संतोष पवार, प्रा. विक्रांत विभुते यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. उद्घाटन सत्राच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रश्मी कन्नूरकर यांनी केले तर आभार प्रा. शिवशरण दुलंगे यांनी मानले.

गुरुवारपासून मोहोळच्या नागनाथ देवाची यात्रा

मोहोळ : श्री क्षेत्र मोहोळ येथील जागृत ग्रामदैवत श्री सद्गुरू नागनाथ देवाच्या यात्रेचा कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली असून चैत्र वैद्यअमावस्या दिनांक २० एप्रिल ते वैशाख शुद्ध दशमी ३० एप्रिल २०२३ पर्यंत होणार आहे.

दि.२० एप्रिल रोजी श्रीस तेल लावण्याचा कार्यक्रम व प्रसाद, रात्री वसंत पूजा चंदन उटी चा कार्यक्रम, दि.२१ रोजी रात्री वसंत पूजा चंदन उटी त्यानंतर हेग्रस वंशज परम पूजनीय विनायक बुवा मोहोळकर यांचे सुश्राव्य प्रवचन दि.२२ एप्रिल रोजी अक्षय तृतीये निमित्त रात्री वसंत पूजा रघुनाथ बुवा विरचित सोमनाथ बबन बुवा कुर्डे यांचे चक्रीभजन, श्री क्षेत्र वडवळ येथून आलेल्या श्रीं च्या छत्रीचे आगमन रात्री एक वाजता, रविवारी पहाटे ४ वाजता श्रीच्या पालखीसह सवाद्य मिरवणूक व दिल्ली दरवाजातील भाकणूक त्यानंतर खर्गतीर्थात वायुरूपातील श्री नागनाथ ज्यांच्या शरीरात संचार झालेले असतात ते खर्गे महाराज व हेग्रस वंशज अरूण काका तथा विनायक बुवा मोहोळकर यांची भेट, तसेच अनेक ठिकाणी पाऊस पाणी पेरणी आरोग्य व रयतेची भाकणूक, दि.२५ रोजी सकाळी भीकलिंग आप्पा महाराजांचा अभिषेक व रात्रौ श्रीं च्या पालखी सवाद्य मिरवणूक आणि परभक्त गुरु शिष्य भेट तसेच शोभेचे दारू काम, दि.२६ एप्रिल रोजी पहाटे श्रीस अभिषेक व दुपारी ४ वाजता श्रीं ची गणासह सवाद्य मिरवणूक व खर्गतीर्थ येथे भेटीचा अवर्णनीय कार्यक्रम त्यानंतर मुंगीच्या धोंड्याच्या मार्गावरून परत नागनाथ मंदिरात आरती व प्रसाद दि.२७ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता कुस्त्याचा जंगी फड व नामवंत मल्लाचा कुस्त्याचा कार्यक्रम होईल. ही यात्रा पार पाडण्यासाठी श्री. नागनाथ देवस्थान पंचकमिटी चे सर्व सदस्य, पोलीस यंत्रणा, सर्व मानकरी, ग्रामस्थ, नगरपरिषद प्रशासन आदि प्रयत्नशील आहेत.

शिवबसव जन्मोत्सव सामाजिक संस्थेच्यावतीने विविध कार्यक्रम

सोलापूर : शिवबसव जन्मोत्सव बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने महात्मा बसवेश्वर महाराजांच्या जयंती निमित्त दि. १८ ते २२ एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष शंकर बंडगर यांनी पत्रकार परिषदेत दिली. शेळगी येथील विद्यानगर या ठिकाणी शिवबसव जन्मोत्सव बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने मंगळवार दि. १८ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.

दि. १९ एप्रिल रोजी ह.भ.प शिवलीला पाटील महाराज यांचा कीर्तन सोहळा होणार आहे. दि. २० एप्रिल रोजी महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दि. २१ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता महात्मा बसवेश्वर महाराज यांचा पाळणा कार्यक्रम रात्री ८ वाजता होणार आहे. दरम्यान, अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर जयंतीनिमित्त महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या मूर्तीची मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून निघणार आहे. शिस्तबद्ध रीतीने लेझीम पथकासह ही मिरवणूक काढण्यात येणार आहे, असेही संस्थापक अध्यक्ष शंकर बंडगर यांनी सांगितले. शिवबसव जन्मोत्सव बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या उत्सव समिती अध्यक्षपदी- नागेश पंधारकर, उपाध्यक्ष - सागर हुनगुंद, अभिषेक काळे, कार्याध्यक्ष - सोमेश पोरे, खजिनदार - राहुल सावळगी, योगेश माकाई, सेक्रेटरी - राकेश मोदी, लेझीम प्रमुख - श्रीशैल लोकापुरे, दीपक मानवे, मिरवणूक प्रमुख - अशोक कोरे, मल्लिकार्जुन सावळगी आदींची निवड करण्यात आली असल्याचेही शंकर बंडगर यांनी यावेळी सांगितले.

प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेची व्याप्ती वाढणार

२० रूपयांत २० लाखांचा विमा; १०१९ गावांचा होणार समावेश

सोलापूर : प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेची व्याप्ती जिल्हाभरात मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येणार आहे. विविध शासकीय बँकांच्या माध्यमातून जुलै पर्यंत ग्रामीण भागातील १८ ते ७० वयोगटातील लाभार्थ्यांचा अवघ्या २० रुपयांमध्ये दोन लाख रुपयांचा विमा उतरवण्यात येणार असून ग्रामविकास विभागाची त्यासाठी मदत घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी सांगितले.

प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेची व्याप्ती वाढवण्याबाबत बँकेच्या प्रतिनिधींची बैठक सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. त्यासंदर्भात माहिती देताना जिल्हाधिकारी शंभरकर म्हणाले,प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेचा वार्षिक हप्ता २० रुपये आहे. या योजनेअंतर्गत सरकार दोन लाखांचा मृत्यू विमा देते. म्हणजेच, या अंतर्गत दोन लाख रुपयांचे कव्हर उपलब्ध आहे. त्यासाठी अर्जदाराचे बँक खाते असणे आवश्यक आहे. ऑनलाईन किंवा बँकेला भेट देऊन प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनांचा अर्ज भरू शकता. तसेच, हा विमा तुम्ही कोणत्याही बँकेतून घेऊ शकता. हिंदी, इंग्रजीसह, स्थानिक भाषेत विमा योजनेचा अर्ज उपलब्ध आहे. विमा हप्ता भरण्यासाठी बँक खात्यातून रक्कम आपोआप कपात होण्यासाठी अर्जामध्ये मंजुरी देणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील १०१९ गावांमध्ये पुढील तीन महिन्यांमध्ये ही योजना व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाचे सहकार्य घेण्यात येईल. अवघ्या २० रुपयांमध्ये दोन लाख रुपयांचा विमा नागरिकांसाठी उपलब्ध होणार असून सरकारच्या या योजनेद्वारे गरीब लोक देखील सामाजिक सुरक्षेचा लाभ घेऊ शकतात.

प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना (PMSBY)

श्री स्वामी समर्थ

स्वामी सेवक
कै.कल्याणराव शि.इंगळे

मुळस्थान
श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथील श्री स्वामी समर्थांच्या १४५ व्या पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी प्रणाम...

श्री.महेश क.इंगळे
चेअरमन
श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट
ट्रस्ट रजि.नं.ए.८५, माजी नगराध्यक्ष/विद्यमान नगरसेवक न.प.अक्कलकोट
फोन - ०२१८१ - २२०३२१, भक्त निवास - ०२१८१ - २२१९०९, रुग्णालय - ०२१८१ - २२२२७२
Email : shrivsmdevasthan@gmail.com

विश्वस्त मंडळ
श्री.ए.एम.घाटगे (सेक्रेटरी)
श्री.सं.न.शिंदे ▪ श्री.द.सि.हिरेमठ ▪ श्री.प्र.ग.झपके
श्री.म.व्यं.गोगी ▪ श्रीमती उ.क.सरदेशमुख ▪ श्री.वि.रा.दास
टीप : देणगीदारास ८० जी कलमान्वये आयकरात सवलत आहे

सेतूच्या मान्यतेसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी डीआयटीच्या सचिवांशी साधला संवाद

१९ एप्रिल रोजी होणार प्रत्यक्ष भेट आणि चर्चा

सुराज्य/सोलापूर

राज्यातील १७ जिल्हामध्ये सेतू संकल्पना नाही सोलापूरचा फेर निविदेचा विषय शासन पातळीवर प्रलंबित आहे. शासनाकडून जो पर्यंत मान्यता मिळत नाही तो पर्यंत सेतू निविदा काढता येत नाही असे सांगत सेतूच्या मान्यतेसाठी १९ एप्रिल रोजी डीआयटीच्या सचिवांशी प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा करणार आहे. असे सांगत शंभरकर यांनी सचिवांची मोबाईलवर सांवाद साधत सेतूच्या प्रक्रियेबाबात चर्चा केली.

सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयातील सेतू कार्यालय बंद झाले आहे, मुदत संपल्यामुळे सेतू बंद करण्यात आला असल्याचे प्रशासनाचे म्हणणे मात्र विद्यार्थ्यां आणि नागरिकांची गैरसोय होऊन नये म्हणून ईमहासेवा केंद्रावर ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. मात्र या केंद्रातून मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट होत असल्याने लोकप्रतिनिधीशी आणि सामाजिक संघटनांनी सदरचा सेतू चालू करण्यासाठी जिल्हाप्रशासनास निवेदने देऊन सेतू कार्यालय चालू करण्याची मागणी केली सोलापूर दौऱ्यांवर आलेल्या पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना या संदर्भात पत्रकारांनी विचारणा केली असता लवकर बैठक घेऊन निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी पालकमंत्री विखे पाटील यांची भेट घेऊन सेतू कार्यालय बंद असल्यामुळे मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे सेतूतील कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. शाळा महाविद्यालय शेतकरी यांना उत्पन्नाचा, जातीचा अल्प भूधारक शेतकरी असल्याचा दाखला व प्रमाणपत्राची आवश्यकता असते तरी सोलापुरातील

सेतू सुविधा केंद्र बंद करण्याचा निर्णयास स्थगिती देण्याची मागणी केली आहे. तसे पत्र पालकमंत्र्यांना दिले त्या पत्रावर पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांनी निविदा प्रक्रिया होईपर्यंत सेतू सुविधा चालू करावी असे आदेश प्रशांत परिचारक यांच्या पत्रावर दिले आहे. याबाबत जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना विचारले असता मुदत वाढ देता येणार नाही मात्र नवीन निविदा बाबात सोमवारी सोलापुरात निर्णय येणार असल्याचे सांगितले.

याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना विचारणा केली असता राज्यातील १७ जिल्ह्यामध्ये सेतू सुविधा नाही बंद आहे. सोलापूर जिल्ह्यातील सेतू ला दोन वेळा मुदत वाढ दिली त्यामुळे पुन्हा मुदत वाढ देता येणार नाही फेर निविदाचा निर्णय शासनाकडे आहे. याबाबत आयटीचे सचिव यांची भेट घेऊन निवेदनाबाबत निर्णय येणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.